नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १७ * अंक २२४ * * भंडारा * सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## गाडीवर पोल कोसळला, सपा नेत्याचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, प्रतापगड, दि. १५ :

उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथून एका अपघाताचा भयानक व्हिडिओ समोर आला आहे. व्हिडिओमध्ये एक जड खांब अचानक चालत्या गाडीवर पडताना दिसत आहे. गाडी खांबाखाली चिरडली गेली. नंतर असे उघड झाले की कारमधील व्यक्तीचा मृत्यू झाला. मृताची ओळख स्थानिक समाजवादी पक्षाचा नेता अशी झाली आहे जो कंत्राटदार म्हणून काम करत होता. अंतु पोलिस स्टेशन परिसरातील बाबुगंज बाजारात ही घटना घडली. कंत्राटदार आणि समाजवादी पक्षाचे नेते लाल बहादूर यादव (४८) हे रविवारी दुपारी क्रेटा कारने शहरात जात असताना अचानक एक अनियंत्रित उंच खांब त्यांच्या गाडीवर पडला. पेट्रोल पंपासमोर खांब उभारताना त्यांचा जागीच मृत्यू झाला.

## कुठे शिवराय, कुठे टिपू




महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नेहमीच जनतेच्या प्रश्नावर बोलतात. त्यांच्या मागे चौकशीचे कोणतेही शुक्लकाष्ट नाही कुठेही, कोणत्याही बँकेचे कर्ज घेऊन त्यांनी संस्था उभ्या केलेल्या नाहीत. शुद्ध गांधीवादी मार्गाने जाणारा हा कार्यकर्ता आहे. काही वर्षांपूर्वी म्हणजे आमदार होण्यापूर्वी त्यांनी ज्येष्ठ गांधीवादी नेते गडचिरोली जिल्ह्यातील सर्च या संस्थेचे डॉक्टर अभय बंग यांचे पिताश्री ठाकूरदास बंग यांच्या नेतृत्वात बुलढाणा जिल्ह्यात पदयात्रा काढली. त्यामागे त्यांची ग्राम सुधारणेसाठी फार मोठी तळमळ होती. अनेक विधायक कामात त्यांचा पुढाकार असतो हे आम्ही स्वतः बघितलेले आहे अशा या निष्कलंक असणाऱ्या काँग्रेसच्या अध्यक्षाला बोलताना आपण कोणती भाषा वापरतो, कोणाबद्दल काय बोलतो आणि त्याचे कोणते परिणाम होतील. त्यामुळे आपल्या विरोधकांना आयतेच कसे कोलीत मिळेल किंवा मिळणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक होते. परवा बुलढाणा येथे एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी शौर्य आणि स्वराज्याचा विचार दिला अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच्या समकक्ष काम केले आहे असा दाखला दिला. त्यानंतर टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे असे म्हणून नको ती उठाठेव करण्याची खरंच काय गरज होती हेच आम्हाला समजत नाही. छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य संस्थापक होते त्यांनी मोगलांच्या सुलतानी शाह्यांना टक्कर देऊन आपले स्वराज्य स्थापन केले. ते एवढे मजबूत होते की, त्यानंतर औरंगजेबाला आधी दिल्ली आणि नंतर आग्रा सोडून मराठ्यांना पराभूत करण्यासाठी महाराष्ट्रात यावे लागले. शेवटी औरंगजेबाचे प्राण अल्लाहने या महाराष्ट्रातूनच उचलून नेले आणि त्यानंतरच्या अवघ्या पंधरा वर्षाच्या आत मोगल साम्राज्य जे कोसळले ते पुन्हा उभे राहिलेच नाही. त्यानंतरचे त्यांचे वंशज मराठ्यांच्या वर्चस्वाखाली होते हेही इतिहासात नमूद आहे. अशा स्वराज्य संस्थापना करणाऱ्या भारताच्या इतिहासातील विश्ववंदनीय राज्यकर्त्याची तुलना वालिदाने स्थापन केलेल्या गादीवर बसणाऱ्या टिपू सुलतान सोबत करावी हे कोणालाही पटणार नाही. टिपू सुलतान याने इंग्रजांविरुद्ध लढाई केली पण त्याच्या राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या सर्व धर्मांचा आदर करणाऱ्या विचारांचा पायंडा नव्हता. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक मंदिरांचा उद्धार केला तसेच मुस्लिमांसाठी मशिदींचा उद्धार करून त्या उभारण्यात आम्ही मदतही केली. जर कधी युद्धकाळात हाती कुराण सापडले तर ते आपल्या सैन्यातील मुसलमान अधिकाऱ्याला किंवा शिपायाला आदराने देत असत, हाही इतिहास सर्वश्रुत आहे. तेव्हा शिवाजी महाराजांच्या पासंगालाही पुरणार नाही अशा टिपू सुलतानाला शिवाजी महाराजांच्या समकक्ष दाखवून सांगण्याची अवदसा हर्षवर्धन यांना कसे काय आठवली, हाच मोठा प्रश्न आहे. त्यांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी असं व्यक्त करताना त्यांना लाज वाटली पाहिजे हे शब्द उच्चारले. टीपू सुलतान आणि शिवाजी महाराज यांची अशी तुलना केल्यामुळे विनाकारण वादाला तोंड फुटलेले आहे. भारतीय जनता पक्षाला मुस्लिम मते नकोतच असे त्यांचे म्हणणे आहे, इकडे काँग्रेस पक्षाला फक्त मुस्लिम मतेच हवी आहेत काय? काँग्रेस पक्ष सर्वधर्म समभावाला मानतो पण असे करताना एखादे विधान कसे स्वतःच्याच अंगलट येऊ शकते याचा नमुना म्हणजे सपकाळ साहेबांचे हे विधान आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्यासमोर असलेल्या कितीतरी प्रश्नांवर बोलणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न तर आत्महत्या करायला लावणारेच आहेत. महागाई दिवसेंदिवस डोंगरासारखी वाढत आहे, बेकारी बेकरीतून निघणाऱ्या पावासारखी फुगत आहे. तेव्हा आजचे हे प्रश्न डोळ्यासमोर आ वासून उभे असताना त्यावर राहुल गांधी यांच्यासारखे घणाघाती हल्ले त्यांना करता येतात आणि तेच विरोधी पक्षाचे काम आहे, ते सोडून नको त्या वादात स्वतःला गुंतवून घ्यायचे कारणच काय. भारतीय जनता पक्ष विरोधात असताना अगदी नेमक्या मुद्द्यावर त्यांनी आंदोलने केली आणि आज ते सत्तेवर आहेत. त्यांची सत्तेवरील मांड आजच्या घडीला इतकी पक्की आहे की त्यांना विरोध करून सत्ता मिळवणे सोपे नाही. दृश्य बहुमत असूनही चंद्रपूरमध्ये चंद्र उगवलाच नाही उलट? तो मावळलाच ना. काँग्रेस पक्षातील लंबीचवडी भांडणे सोडवणे हाच त्यांच्या समोरील मोठा प्रश्न आहे. गटागटातील विभागणी सोडवण्याऐवजी टीपू सुलतान यांना थोर बनवणे हे नको ते कर्म आहे. त्याचे मर्म ओळखून आता तरी त्यांनी आपल्या स्वभावानुरूप सभ्यवाणीत बोलावे. एवढेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा मातृतीर्थ जिल्हा असलेल्या बुलढाणा करांबरोबर महाराष्ट्राच्या संपूर्ण जनतेचे म्हणणे आहे.

जय जिजाऊ! जय शिवराय!!

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# यवतमाळ-अहिल्यानगरमध्ये एटीएसकडून छापेमारी

■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. १५ :

महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने राज्यात मोठ्या प्रमाणावर कारवाई केली आहे. मुंबई अळर ने सकाळपासून यवतमाळ जिल्ह्यातील पुसद आणि उमरखेड येथे १४ ठिकाणी आणि अहिल्यानगर (अहमदनगर) येथे ७ ठिकाणी शोधमोहीम सुरू केली. काही तरुणांना दहशतवादी संघटनांशी संपर्क साधून सक्रिय करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची गुप्त माहिती अळर ला मिळाली होती.




एटीएसने सर्वात मोठी कारवाई विदभर्तील यवतमाळ जिल्ह्यात केली आहे. जिल्ह्यातील पुसद आणि उमरखेड या दोन शहरांमध्ये तब्बल १४ ठिकाणी छापे टाकण्यात आले आहेत. एटीएस प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या थेट नेतृत्वाखाली ही मोहीम राबवली जात असून, एकट्या यवतमाळ जिल्ह्यात एटीएसची २० पथके तैनात आहेत. या कारवाईत वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांसह स्थानिक पोलिसांचा मोठा ताफा सहभागी आहे. अहिल्यानगरमधील मुकुंदनगर या भागात एटीएसने ७ ठिकाणी छापेमारी केली. गेल्या काही काळात औरंगजेबाचे उदात्तीकरण आणि आक्षेपार्ह घोषणाबाजीमुळे हा भाग चर्चेत आला होता. काही तरुण दहशतवादी संघटनांच्या संपर्कात असल्याची आणि त्यांना सक्रिय करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर एटीएसने ही गोपनीय कारवाई केली.

काही तरुण दहशतवादी संघटनांच्या संपर्कात असून ते सक्रिय होत असल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. या माहितीच्या आधारे एटीएस प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या नेतृत्वाखाली विविध पथके तयार करण्यात आली. या मोहिमेत वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि स्थानिक पोलिसांचीही मदत घेतली जात आहे. अकोला जिल्ह्यातील उरळ पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या भागातही रात्रीपासून ही कारवाई सुरू आहे.

आज महाशिवरात्र असल्याने राज्यभरातील मंदिरांमध्ये भाविकांची मोठी गर्दी आहे. तसेच शिवजयंती आणि इतर सण-उत्सव तोंडावर आहेत. याच काळात राज्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून एटीएसने ही तातडीची पावले उचलली आहेत का, अशी चर्चा सुरू झाली आहे. रात्रभर चाललेल्या या मोहिमेत अनेक संशयितांची कसून चौकशी करण्यात आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काही तरुणांना आणि संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. मात्र, अद्याप कुणालाही अधिकृतपणे अटक केल्याची माहिती समोर आलेली नाही. ही कारवाई अत्यंत गोपनीय पद्धतीने राबवली जात असून, यातून मोठे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### भारत ८, पाकिस्तान १

## पाकिस्तानला चारमुंड्या चित करत भारत सुपर-८ मध्ये

कोलंबो, दि. १५ : महाशिवरात्रीचा मुहूर्त आणि समोर पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान... अशा हायव्होल्टेज वातावरणात टीम इंडियाने आपल्या नावाचा डंका वाजवला आहे. श्रीलंकेच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या टी-२० विश्वचषक २०२६ च्या थरारात सूर्यकुमार यादवच्या यंग ब्रिगेडने पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवला. या विजयासोबतच भारताने दिमाखात सुपर-८मध्ये धडक मारली असून पाकिस्तानच्या विश्वचषकातील आशा आता अधांतरी आहेत.

**इशान किशनने केल्या ७७ धावा**

**ईशान किशनचा तांडवा**

प्रथम फलंदाजी करताना भारतीय फलंदाजांनी पाकिस्तानी गोलंदाजीची पिसे काढली. ईशानने ४० चेंडूत १० चौकार आणि तीन षटकारांसह ७७ धावा केल्या, तर कर्णधार सूर्यकुमार यादवने २९ चेंडूत तीन चौकारांसह ३२ धावा केल्या. यामुळे भारताने निर्धारित २० षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात १७५ धावांचा आव्हानात्मक डोंगर उभा केला.




**पाकिस्तानची फलंदाजी सुपर फ्लॉप :** विजयासाठी १७६ धावांचं आव्हान मिळालं असताना पाकिस्तानचे फलंदाज मैदानात उतरले. मात्र पहिल्याच ओव्हरमध्ये हार्दिक पंड्याने साहिबजादा फरहानला शून्यावर बाद केले. त्यानंतर पाकिस्तानची फलंदाजी ढासळतच गेली आणि ७८ धावांपर्यंत त्यांनी ७ विकेट्स गमावल्या. पाकिस्तानकडून उस्मान खानने ४४, शाहीन आफ्रिदीने २३, शादाब खानने १४ तर फहीम अश्रफने १० धावा केल्या.

### सुटीची सूचना

महाशिवरात्रीनिमित्त सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी महासागर कार्यालयास सुटी असल्याने मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ चा अंक प्रकाशित होणार नाही. सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

व्यवस्थापक

### कर्नाटकातील केमिकल फॅक्टरीत मोठा स्फोट

## दोन कामगारांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, मंड्या, दि. १५ :

कर्नाटकातील मंड्या जिल्ह्यातून मोठी बातमी समोर आली आहे. कारेकट्टे गावाजवळील एका फॅक्टरीत केमिकल स्टोरेज टँकचा स्फोट झाला. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे, तर चार जण गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. पोलिसांनी आता तपास सुरू केला आहे आणि बसरालू पोलिस स्टेशनमध्ये प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) दाखल केला आहे.

गुड्डू खान असे कंत्राटदाराचे नाव असून तो पळून गेला आहे आणि सध्या त्याची चौकशी सुरू आहे. केमिकल फॅक्टरीचे स्थलांतर सुरू असताना हा स्फोट झाल्याचे वृत्त आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला आणि इतर जखमींना मंड्या इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये दाखल करण्यात आले आहे. कारखान्यातील साहित्य काही दिवसांपासून कारेकट्टेहून नवीन ठिकाणी हलवले जात होते. दरम्यान, रविवारी केमिकल टँक रिकामा करताना हा अपघात झाला.

### मुलुंड मेट्रो दुर्घटना प्रकरणी

## प्रोजेक्ट डायरेक्टरसह ५ जणांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :

मुलुंड मेट्रोचा स्लॅब कोसळून झालेल्या अपघात प्रकरणी आता कायदेशीर कारवाईला वेग आला असून, याप्रकरणी पोलिसांनी रिलायन्स अस्तालदीशी संबंधित 'मिलन रोड बिल्डटेक' या कंत्राटदार कंपनीवर गुन्हा दाखल करत आतापर्यंत पाच जणांना अटक केली आहे. यामध्ये प्रोजेक्ट डायरेक्टर हरीश चौहान, प्रोजेक्ट मॅनेजर कुलदीप सपकाळ, डेप्युटी मॅनेजर सौरभ सिंह, सुपरवायझर प्रशांत भोईर आणि अवधूत इनामदार यांचा समावेश असून, निष्काळजीपणाचा ठपका ठेवत या सर्वांवर अटकेची कारवाई करण्यात आली आहे.

मुलुंड येथील एलबीएस रोडवर वडाळा ते कासारवडवली मेट्रो मार्गिकेचे काम सुरू असताना स्लॅब कोसळून मोठी दुर्घटना घडली. जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ झालेल्या या अपघातात उत्तर प्रदेशातील पर्यटक रामधन यादव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, अन्य तीन जण जखमी झाले आहेत. एमएमआरडीए मार्फत सुरू असलेल्या या प्रकल्पाच्या ढिगाऱ्याखाली तीन वाहने दबली गेली असून, या घटनेमुळे ठाण्याकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक तब्बल ७ तास बंद ठेवण्यात आली होती.

ज्या टप्प्यात हा अपघात झाला, तिथल्या बांधकामाची जबाबदारी टाटा प्रोजेक्ट्स आणि चायना हार्बर इंजिनिअरिंगकडे असल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर आले आहे.

## तेजस ठाकरे यांची प्रकृती बिघडली

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे धाकटे चिरंजीव आणि प्रसिद्ध वन्यजीव संशोधक तेजस ठाकरे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना मुंबईतील रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बुधवारी त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने तातडीने उपचारासाठी नेण्यात आले. तेव्हापासून त्यांच्यावर उपचार सुरू असून, सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून सुधारणा होत आहे.

## न्यायाधीशांच्या निवासस्थानी चोरी

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १५ :

शहरातील सुरक्षित समजल्या जाणाऱ्या कांतानगर भागात चोरट्यांनी न्यायाधीशांच्या निवासस्थानांना लक्ष्य केले. न्यायाधीशांच्या या वसाहतीत चोरट्यांनी शनिवारी मध्यरात्रीनंतर चांगलाच धुमाकूळ घातला. विशेष म्हणजे प्रवेशद्वाराजवळ पोलिसांचा खडा पहारा असतानाही चोरट्यांनी पाच न्यायाधीशांसह चार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या घराचे कुलूप तोडून चोरी केली. या धाडसी चोरीच्या तपासाचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

शनिवारी आणि रविवारी सलग दोन दिवस न्यायालयाला सुटी असल्याने अनेक न्यायाधीश आणि कर्मचारी बाहेरगावी गेले होते. चोरट्यांनी याचाच फायदा घेत या परिसराची आधीच रेकी केली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. कांतानगर परिसरात नलदमयंती आणि पैनगंगा अशा दोन वसाहती आहेत. नलदमयंती या नवीन इमारतीमधील तीन न्यायाधीशांच्या घरी चोरी करण्यात आली, तर बाजूलाच असलेल्या पैनगंगा या इमारतीतील दोन न्यायाधीशांची घरे फोडण्यात आली.

न्यायाधीशांच्या घरांसोबतच पाठीमागे असलेल्या वसाहतीतील चार कर्मचाऱ्यांच्या घरांचेही कुलूप तोडण्यात आले. चोरीच्या घटनेची माहिती मिळताच सकाळी पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे यांच्यासह फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झाले.

## जमीन घोटाळ्यात राऊत कारागृहात राहून आलेत

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर दि. १५ :

शिवसेना (उबाठा) नेते खासदार संजय राऊत हे जमीन घोटाळ्यात कारागृहात राहून आले आहेत. ते हे विसरले असतील, लोक विसरले नाहीत. त्यांच्याकडे असलेल्या सर्व चित्रफिती त्यांनी दाखवाव्या, त्यावर चोख उत्तर दिले जाईल, असा प्रतिहल्ला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नागपूर येथे केला.



पर्यावरण संसद या कार्यक्रमासाठी नार्वेकर नागपूरमध्ये आले होते, त्यावेळी ते वृत्तवाहिन्यांशी बोलत होते. अलिबाग प्रकरणामध्ये राऊत यांनी त्यांच्याकडे आणखीही चित्रफित असल्याचा दावा करीत नार्वेकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. याकडे नार्वेकर यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, त्यांना अफवा पसरवायला आवडतात.

अलिबागमध्ये दीडशे वर्षापासून आमच्या कुटुबांचे वास्तव आहे. मी अलिबागला वारंवार जात असतो. तेथे माझी शेती आहे. घटनेच्या दिवशी दोन लोकांमध्ये वाद होताना दिसला. त्यावेळेला तिकडे मारामारी होत होती. म्हणून मी तिकडे गेलो व शांत करण्याचा प्रयत्न केला. त्या जागेशी माझे काही देणे घेणे नाही.

# आशा सेविकांच्या संघर्षाला सन्मानाची किनार

### डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या पुढाकारातून दिंद्रुड येथे पैठणी देऊन गौरव, अभिनेत्री वर्षा उसगावकर यांची भावनिक साक्ष

■ वृत्तसंस्था, बीड, दि. १५ :

ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा कणा असलेल्या आशा सेविकांच्या संघर्षाला सन्मानाची किनार देत त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा भावनिक व प्रेरणादायी सन्मान सोहळा माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे पार पडला. देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या भव्य आशा सन्मान सोहळ्यात आशा सेविकांना अस्सल पैठणी व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी आशा सेविकांच्या संघर्षाचे आणि सेवाभावाचे मनापासून कौतुक करताना, त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देण्याचे कार्य डॉ. ओमप्रकाश शेटे प्रामाणिकपणे करत असल्याचे प्रतिपादन केले. कोविडसारख्या कठीण काळातही आशा सेविकांनी जीव धोक्यात घालून घराघरांत जाऊन तपासणी, जनजागृती आणि रुग्णसेवा केली. मात्र असे असूनही शासकीय व सामाजिक पातळीवर त्यांची उपेक्षा होत असल्याची खंत व्यक्त करत वर्षा उसगावकर म्हणाल्या की, आशा सेविका या समाज आणि आरोग्य विभाग यांच्यातील जिवंत दुवा आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन सन्मान करण्याची संकल्पनाच माणुसकी जपणारी आहे. मोठ्या पदावर कार्यरत असतानाही कोणताही अभिनिवेश न बाळगता उपेक्षित घटकांसाठी झटणाऱ्या डॉ. शेटे यांच्या कार्यातून त्यांचा मनाचा मोठेपणा दिसून येतो, असेही त्या म्हणाल्या.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ओमप्रकाश शेटे, अध्यक्ष - आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती, हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई रोटरीचे माजी गव्हर्नर राजेंद्र अगरवाल, चाइल्ड हेल्प फाउंडेशनचे मुख्य ट्रस्टी राजेंद्र पाठक, सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिवाजीभाऊ रांजवण आणि तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मधुकर घुबडे, उद्योजक शिल्पा शेटे यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी हजारो महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.



## टिपू सुलतानची शिवाजी महाराजांशी तुलना
# काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या पुतळ्याचे दहन

■ महासागर प्रतिनिधी
मालेगाव, दि. १५ :

मालेगाव महानगरपालिकेतील उपमहापौर शान-ए-हिंद यांच्या दालनात टिपू सुलतान यांचे छायाचित्र लावण्यावरून सुरू झालेला वाद शमला असतानाच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उडी घेतल्याने हा वाद पुन्हा उफाळून आल्याचे दिसत आहे. सपकाळ यांनी टिपू सुलतान यांची तुलना थेट छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याने सर्वत्र संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. सपकाळ यांच्या विधानाचा निषेध म्हणून मालेगावात भाजपने रविवारी दुपारी आक्रमक पवित्रा घेत सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारले आणि त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन देखील केले.



समाजवादी पार्टीच्या नवनिर्वाचित उपमहापौर शान-ए-हिंद यांच्या दालनात टिपू सुलतान यांचे छायाचित्र लावण्यात आले होते. त्यावरून मालेगावात मोठे वादंग निर्माण झाले. शिवसेना शिंदे गट आणि हिंदुत्ववादी संघटनांनी त्यावर तीव्र आक्षेप नोंदवला होता. शहरात तणाव निर्माण होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी,यासाठी महापालिका प्रशासनाने हस्तक्षेप करत शनिवारी सकाळी हे छायाचित्र तातडीने हटविण्याची कार्यवाही केली. यामुळे या वादावर पडदा पडला असे वाटत असतानाच, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या एका विधानामुळे आगीत तेल ओतले गेले आहे.

सपकाळ यांनी टिपू सुलतान यांची छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी तुलना करुन दोघांना समकक्ष ठरवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे केवळ मालेगावातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक बड्या नेत्यांनी सपकाळ यांच्यावर टीकेची झोड उठवली. मालेगावातील भाजप कार्यकर्त्यांनी सपकाळ यांच्या विधानाविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. येथील महात्मा गांधी पुतळ्याजवळ भाजप कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन घोषणाबाजी करत सपकाळ यांचा तीव्र निषेध केला. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. त्यांची तुलना धर्मांध राजवटीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टिपू सुलतानशी करणे, हे केवळ ऐतिहासिक अज्ञानच नाही तर,महाराष्ट्राच्या अस्मितेवर केलेला थेट आघात आहे, अशी भावना यावेळी संतप्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी सपकाळ तसेच काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सपकाळ यांच्यासारख्या वादग्रस्त व्यक्तीला महाराष्ट्रात राहण्याचा नैतिक अधिकार नाही. केवळ माफी मागून हे प्रकरण मिटणार नाही, तर काँग्रेस पक्षाने हर्षवर्धन सपकाळ यांना तात्काळ पदावरून बडतर्फ करावे,अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली. यावेळी संतप्त आंदोलकांनी सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारले. तसेच त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले. या आंदोलनात भाजपचे जिल्हाध्यक्ष नीलेश कचवे, महानगर प्रमुख देवा पाटील, नगरसेवक मदन गायकवाड, भरत पोफळे, हरिप्रसाद गुप्ता, दादा जाधव, सुनील चौधरी,योगेश निकम, संदीप भुसे, भाग्येश कासार आदी सामील झाले होते.

## अल्पवयीनांकडून दोन पिस्तुलांसह चार काडतुसे जप्त

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :

खून प्रकरणात प्रतिस्पर्धी टोळीकडून हल्ला होण्याची भीती वाटल्याने देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या दोन अल्पवयीनांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन पिस्तुले, तसेच चार काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी परिसरात ही कारवाई करण्यात आली.

तीन महिन्यांपूर्वी झालेल्या खून प्रकरणात अल्पवयीनाला ताब्यात घेण्यात आले होते. खून झालेल्या तरुणाचे साथीदार हल्ला करण्याची भीती अल्पवयीनाला वाटली होती. त्यामुळे अल्पवयीन आणि त्याच्या मित्राने पिस्तूल बाळगले होते. दोघांविरुद्ध यापूर्वी गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले आहेत. दोघे जण विठ्ठलवाडीतील नदीपात्रात थांबल्याची माहिती सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी विनायक मोहिते आणि सागर शेडगे यांना मिळाली. नदीपात्रातील स्मशानभूमीजवळ सापळा लावून अल्पवयीन आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्राला पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी दोघांची झडती घेतली. तेव्हा त्यांच्याकडे देशी बनावटीची दोन पिस्तुले आणि चार काडतुसे सापडली. बेकायदा शस्त्र बाळगल्या प्रकरणी दोघांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, उत्तम तारु, अण्णा केकाण, विकास बांदल, राहुल ओलेकर, सागर शेडगे, समीर माळवदकर, सतीश मोरे, विनायक मोहिते, शिरीष गावडे यांनी ही कामगिरी केली.

# हर्षवर्धन सपकाळांमुळे भाजपच्या बुडाला आग

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :



भाजपने टिपू सुलतानच्या मुद्यावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याविरोधात छेडलेल्या आंदोलनाचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी खरपूस समाचार घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पराक्रम एकमेवाद्वितीय आहे याविषयी दुमत नाही. पण हर्षवर्धन सपकाळ यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या दादागिरीचा व्हिडिओ शेअर केल्याने भाजपच्या बुडाला आग लागली आहे. या प्रकरणावरून जनतेचे लक्ष हटवण्यासाठी भाजपला ही सगळी नौटंकी करावी लागत आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी कथितपणे टिपू सुलतान यांची तुलना कथितपणे छत्रपती शिवाजी महाराजांशी केली होती. भाजपने या प्रकरणी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. या पार्श्वभूमीवर सुषमा अंधारे यांनी काँग्रेसची बाजू घेत भाजपचा खरपूस समाचार घेतला आहे. मुलुंड येथील मेट्रो स्लॅबची दुर्घटना व राहुल नार्वेकरांच्या व्हिडिओवरून लक्ष हटवण्यासाठी भाजप टिपू सुलतानच्या मुद्यावर हेतुपुरस्सर आंदोलन करत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. सुषमा अंधारे आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या, छत्रपती शिवरायांचा पराक्रम एकमेव द्वितीय आहे. याबद्दल दुमतच नाही .

पण काल मुलुंडला झालेल्या मेट्रो स्लॅबच्या दुर्घटनेला झाकण्यासाठी आणि राहुल नार्वेकरांचा दादागिरी करतानाचा व्हिडिओ काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ साहेब यांनी शेअर केल्याने भाजपच्या बुडाला आग लागलेली आहे. एकाच वेळी मेट्रो दुर्घटना आणि नार्वेकर या दोन्ही बातम्यांवरील जनतेचे लक्ष हटवण्यासाठी भाजपाला ही सगळी नौटंकी करावी लागत आहे.

भाजप कार्यकर्त्यांच्या मनात खरंच जर छत्रपती शिवरायांच्या बद्दल एवढं प्रेम, आपुलकी आणि आदर असता तर त्यांनी आज जे पुण्यात आंदोलन केलं हे आंदोलन त्यांनी खूप आधी भगतसिंह कोश्यारींच्या समोर राज्यपाल भवनला केले असते. ही सगळी जी तोडफोड आहे किंवा आत्ताची जी सगळी गुंडागर्दी आहे ती कदाचित प्रशांत कोरटकरसाठी त्यांनी राखीव ठेवली असती.

ज्या भाजपच्या नेते म्हणवणाऱ्या फडणविसांनी छत्रपती शिवरायांच्या अवमानाबद्दल सभागृहात साधा निंदा व्यंजक ठराव मांडला नाही त्यांना खरेच आज नौटंकी करण्याचा नैतिक अधिकार आहे का? मेट्रो दुर्घटना आणि कालचे राहुल नार्वेकरांचे प्रताप झाकण्यासाठी भाजप आत्ता हा सो कॉल्ड ड्रामा उभा करत आहे. कुठलेही विकास काम आम्हीच केलं असं म्हणून क्रेडिट घ्यायला पुढे येणारे फडणवीस कालच्या दुर्घटनेनंतर साधं ट्विट ही करायला पुढे आले नाहीत, त्यावर आधी भाजपच्या गल्लाभरू प्रवकत्यांनी उत्तरे दिली पाहिजेत, असे सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे.

## टिपू सुलतानची तुलना शिवरायांशी करणे ही जिहादी मानसिकता



■ मुंबई : टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी करणे ही जिहादी मानसिकता दर्शवते. टिपूने लाखो हिंदूंना धर्मांतर केले, मंदिरे नष्ट केली आणि केवळ इस्लाम प्रसारावर लक्ष केंद्रित केले. तो आमच्या शिवरायांच्या पायाशीही येऊ शकत नाही, असे म्हणत मंत्री नीतेश राणे यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या टिपू सुलतानबाबतच्या वादग्रस्त विधानावर टीका केली आहे. नीतेश राणेंनी पुढे म्हटले आहे की, काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी आपल्या कार्यालयात शिवरायांचे फोटो काढून फक्त टिपूचे लावले तर बघू, महाराष्ट्रातील मावळे त्यांना कसे परवानगी देतात. हर हर महादेव! असे म्हटले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानचे शौर्य छत्रपती शिवाजी महाराजांसारखेच आहे, असे वक्तव्य केल्याने नवा वाद सुरू झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य ज्या पद्धतीचं आहे त्यांचा आदर्श घेऊन टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा पुकारला होता आणि त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे भारताचे भूमिपुत्र होऊन गेले. शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांना शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघितलं पाहिजे. फडणवीस म्हणाले की, टिपू सुलतान आणि छत्रपती शिवरायांच्या तुलनेबद्दल सपकाळांनी माफी मागितली पाहिजे. काँग्रेसच्या मित्रपक्षांनीही त्यांची भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

# पाकिस्तान टिपू सुलतानाला नायक मानतो मग त्यांच्याशी क्रिकेट खेळता कसे?

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १५ :



ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पाकिस्तानसोबतच्या क्रिकेट सामन्यांवरून भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पाकिस्तानमध्ये टिपू सुलतानाला नायक आणि महान योद्धा मानले जाते. अशा देशासोबत भारत क्रिकेट खेळत असेल, तर देवेंद्र फडणवीस आणि भाजपने त्याचाही निषेध केला पाहिजे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. आम्ही पाकिस्तानसोबत क्रिकेटचा धिक्कार करतो, असे फडणवीस आणि भाजपच्या नेत्यांनी सांगायला पाहिजे पण ते तसे म्हणणार नाही ते ढोंगी आहेत.

संजय राऊत म्हणाले की, पाकिस्तानमध्ये टिपू सुलतानाचे पुतळे आहेत आणि शालेय अभ्यासक्रमातही त्याचा समावेश आहे. मग त्याला नायक मानणाऱ्या देशासोबत भारत क्रिकेट खेळतोच कसा? फडणवीस आणि भाजपची राष्ट्रभक्तीची उर्मी उचंबळून वर आली पाहिजे. आम्ही पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळणार नाही, असे ठामपणे त्यांनी जाहीर करावे. मात्र भाजप तसे करणार नाही, कारण त्यांची भूमिका ढोंगी आहे, अशी टीका त्यांनी केली.

भारत-पाकिस्तान सामन्यांवर हजारो कोटींची सट्टेबाजी होत असल्याचा गंभीर आरोपही राऊतांनी केला. मागील सामन्यातून सट्ट्याच्या माध्यमातून पाकिस्तानला तब्बल 25 हजार कोटी रुपये मिळाल्याचा दावा त्यांनी केला. हा पैसा पुलवामा आणि पहलगामसारख्या दहशतवादी हल्ल्यांसाठी वापरला जातो, असेही ते म्हणाले. या व्यवहारातील काही हिस्सा सरकारमधील काही लोकांनाही मिळतो, असा खळबळजनक आरोप त्यांनी केला.

मालेगावच्या उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतानाचा फोटो हटवण्याचा मुद्दा किरकोळ असल्याचे सांगत राऊत म्हणाले, खरा प्रश्न हा आहे की भारत पाकिस्तानशी क्रिकेट खेळतोच का? भाजप केवळ आर्थिक फायद्यासाठी पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळते.

## तरुणाचा स्क्रू ड्रायव्हरने भोसकून खून

■ महासागर प्रतिनिधी, पिंपरी, दि. १५ :

चाकणमध्ये जुन्या भांडणाचा राग मनात धरून एका तरुणाचा स्क्रू ड्रायव्हरने भोसकून खून करण्यात आला. ही घटना चाकण मध्ये घडली. प्रथमेश शशिकांत माने असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. या प्रकरणात शशिकांत दाजी माने (४८, कमल पार्क सोसायटी, निघोजे, खेड, पुणे) यांनी चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी वैभव संजय शिंदे (माणिक चौक, श्रीराम सोसायटी, चाकण) याला अटक केली आहे. इतर तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा मुलगा प्रथमेश आणि त्याचे मित्र आरोपी यांचे मागील काही दिवसांपूर्वी किरकोळ कारणावरून भांडण झाले होते. त्या भांडणाचा राग आरोपींच्या मनात होता. प्रथमेश याला त्याच्या मित्रांनी शनिवारी दुपारी साडेतीन वाजता चाकण मधील एका पक्षाच्या कार्यालयाजवळ गाठले. जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी प्रथमेशच्या छातीत स्क्रू ड्रायव्हरने वार केले. तसेच फरशीने त्याच्या डोक्यात मारहाण करून त्याला जागीच ठार केले. चाकण उत्तर पोलीस तपास करत आहेत. पिंपळे निलख परिसरात एका भरधाव ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत एका महिलेचा मृत्यू झाला.

## सुनेत्रा पवारांच्या मदतीला कधीही जाऊ

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी सत्ताधारी राष्ट्रवादीला कोणत्याही वेळी मदत करण्याची तयारी दर्शवली आहे. आमच्या पक्षाकडे शरद पवारांचे नेतृत्व आहे. आचे स्वतंत्र अस्तित्व आहे. पण वेळ पडल्यास आम्ही केव्हाही सुनेत्रा पवारांच्या मदतीला धावून जाऊ, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे शरद पवार गटाने विलीनीकरणाच्या चर्चेचा मुद्दा आता मागे टाकल्याचे स्पष्ट झाले आहे.

अजित पवारांचे गत 28 जानेवारी रोजी झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. तेव्हापासून दोन्ही राष्ट्रवादीच्या कथित विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आला आहे. पण आता जयंत पाटील यांनी ही चर्चा मागे पडल्याचे स्पष्ट संकेत दिलेत. ते यासंबंधी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, माझी विलीनीकरणाच्या मुद्यावर भाष्य करण्याची इच्छा नाही. शरद पवार आमच्या पक्षाचे नेतृत्व करतात. आमच्या पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व आहे. आमचा पक्ष त्या दृष्टीने वाटचाल करेल. आमची सुनेत्रा पवार किंवा पार्थ पवार यांच्या समोर अडथळे किंवा प्रश्न उभे करण्याची इच्छा नाही. राजकारणात उद्या काय होईल हे आज सांगता येत नाही.

## हर्षवर्धन सपकाळांनी नाक घासून माफी मागावी : अमित साटम



■ मुंबई : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी केलेल्या वादग्रस्त विधानचे पडसाद आता उमटण्यास सुरू झाले आहे. सपकाळ यांनी टिपू सुलतानला छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे विधान केले होते. यावरून भाजपने काँग्रेससह सपकाळ यांच्यावर हल्लाबोल सुरू केला आहे. भाजप नेते अमित साटम यांनी ट्विट करत सपकाळ यांच्यावर टीका केली आहे. सपकाळ यांनी तात्काळ नाक घासून माफी मागावी, अशी मागणी साटम यांनी केली आहे. अमित साटम यांनी ट्विट करत म्हटले की, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे वक्तव्य केवळ निंदनीय नाही, तर संतापाच्या पलीकडचे आहे. अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतानाशी करणे हा इतिहासद्रोह आहे, शिवप्रेमींच्या श्रद्धेवर घाला आहे.

## दत्तमंदिरात महाशिवरात्रीनिमित्त १०१ किलो चक्क्याची पिंडी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :

महाशिवरात्रीनिमित्त पुणे येथील कै. श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिरात १०१ किलो चक्क्याची शंकराची पिंडी साकारण्यात आली. बुधवार पेठेतील श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टतर्फे आयोजित या 'चक्केश्वराच्या पूजे'साठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या पिंडीसोबतच बदाम, मनुके, द्राक्षे यांसह विविध फळे आणि फुलांनी सजावट करण्यात आली होती. तसेच, लीना भागवत, लता आणि प्रमोद भगवान यांनी जागेवरच तयार केलेला उमा शंकराचा रेखीव चक्क्याचा मुखवटा हे विशेष आकर्षण ठरले. मंदिरात बारा ज्योतिर्लिंगांची चित्रेही लावण्यात आली होती.

प्रभागातील नवनिर्वाचित नगरसेवक स्वप्नाली पंडित, राघवेंद्र उर्फ बापू मानकर आणि कुणाल टिळक यांच्या हस्ते नितीन पंडित यांच्यासह आरती करण्यात आली. यावेळी दत्तमंदिर ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार, कोषाध्यक्ष युवराज गाडवे, उत्सव प्रमुख महेंद्र पिसाळ, विश्वस्त सुनील रुकारी आणि राजेंद्र बलकवडे आदी उपस्थित होते.

## गॅस सिलिंडरच्या स्फोटात तीन घरे आगीच्या भक्षस्थानी

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. १५ :

शहरातील रामेश्वर कॉलनी परिसरात अपार्टमेंटच्या वाहनतळाला लागलेल्या आगीमुळे १८ दुचाकी जळून खाक झाल्याची घटना ताजी असतानाच, रविवारी जुन्या जळगाव भागात घरगुती गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने तीन घरे आगीच्या भक्षस्थानी पडली. या घटनेत संबंधित कुटुंबांचे मोठे नुकसान झाले आहे.



जुन्या जळगावातील तरुण कुढापा चौक परिसरात रविवारी सकाळी साधारण १० वाजेच्या सुमारास भीषण आग लागल्याने तीन घरे पूर्णपणे जळून खाक झाली. या दुर्घटनेत निलेश शंकर शिरसाट आणि बापू शंकर शिरसाट यांच्या घरांना सर्वाधिक मोठा फटका बसला असून, संसारोपयोगी वस्तू, कपाटातील रोख रक्कम, सोन्याचे दागिने आणि महत्त्वाची कागदपत्रे आगीत भस्मसात झाली आहेत.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्राथमिक माहितीनुसार, घरामध्ये अचानक शॉर्ट सर्किट झाल्याने आगीची ठिणगी पडली. काही क्षणांतच ही आग वाढत गेली आणि घरातील गॅस सिलिंडरचा मोठा स्फोट झाला. स्फोट इतका भीषण होता की आगीच्या ज्वाळांनी शेजारील घरांनाही वेढा घातला. लाकडी पार्टिशनची घरे असल्यामुळे आग झपाट्याने पसरली. काही वेळातच तीनही घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

आगीच्या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली. धूर आणि ज्वाळांचे प्रचंड लोट पाहून परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. काही जणांनी घरातील सदस्यांना सुरक्षित बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, तर काहींनी पाण्याच्या सहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीचे स्वरूप इतके भीषण होते की स्थानिकांच्या प्रयत्नांना मर्यादा आल्या.

## सुनेत्रा पवार मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या पाठिशी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा अजित पवार यांनी कार्यालयातील लिपिकाच्या लाचखोरीमुळे अडचणीत सापडलेल्या मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या पाठिशी उभे राहण्याचे संकेत दिलेत. या प्रकरणी चर्चा करण्यासाठी त्यांनी सोमवारी सायंकाळी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक बोलावली आहे. त्यामुळे या बैठकीत त्या झिरवाळ यांच्यासह पक्षाच्या ध्येय धोरणांसंदर्भात एखादा ठोस निर्णय घेतील असा अंदाज आहे. राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिक राजेंद्र ढेरिंगे याला एसीबीने 50 हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे.

## सिएमआर मिलींग करणाऱ्या व त्यांच्या नातेवाईकांचे गोदाम किरायाने घेण्यात येऊ नये
# किशोर कऱ्हाडेची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १५ :

गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर मिलींग करणारे राईसमिलर्स सिएमआर मिलींग मध्ये प्रचंड गैरव्यवहार करून शासनाची कोट्यवधी रुपयाने फसवणूक करीत असल्याचे अनेक घटनांवरून स्पष्ट झाल्याने शासनाने गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर तांदुळ जमा करण्याकरीता सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सच्या मालकीचे अथवा त्यांच्या नातेवाईकांच्या मालकीचे गोदाम किरायाने घेण्यात येऊ नये,अशी मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की गडचिरोली जिल्ह्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शासनाने शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला धान जिल्ह्यातील राईसमिलर्सना भरडाई करीता देण्यात येतो.भरडाई नंतर तयार झालेला तांदूळ शासकीय गोदामात जमा करण्यात येतो.परंतु शासकीय गोदामाची साठवणूक क्षमता अपुरी असल्यास खाजगी गोदाम किरायाने घेण्यात येतात.

देसाईगंज (वडसा)नैनपुर येथील आकाश अग्रवाल गोदाम व कुरुड येथील पंकज मोटवाणी गोदाम शासनाने पणन हंगाम २०२२-२३ ते २०२४-२५ मध्ये किरायाने घेतलेले आहेत.

या दोन्ही गोदाम मध्ये सिएमआर तांदूळ जमा करतांना सिएमआर धान भरडाई करणाऱ्या राईसमिलर्सनी वरील दोन्ही गोदामावर नियुक्त गुणनियंत्रण अधिकारी व पुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकारी यांचेसोबत संगनमत करून प्रचंड गैरव्यवहार व घोटाळे केले आहेत.

दरम्यान उपरोक्त गोदामातुन सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून पुरवठा करण्यात आलेला तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आला आहे.त्यामुळे सिएमआर तांदूळ गोदाममध्ये जमा करतांना होणारे गैरव्यवहार टाळण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यात सिएमआर तांदूळ जमा करण्याकरिता सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सच्या मालकिचे व त्यांचे नातेवाईकांच्या मालकिचे गोदाम किरायाने घेण्यात येऊ नये,अशी मागणी कऱ्हाडे यांनी केली आहे.याबाबत प्रधान सचिव काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

# नाशिक-पालघर प्रवास आता अधिक गतीमान
## घोटी-त्र्यंबक-जव्हार-पालघर १५४ किमी मार्गाचे चौपदरीकरण

■ महासागर प्रतिनिधी,
नाशिक, दि. १५ :

नाशिक शहराची इतर महत्वाच्या शहरांशी रस्तेमार्गे संपर्क व्यवस्था अधिक मजबूत आणि वेगवान करण्यासाठी राज्य सरकारच्या मदतीला केंद्र सरकारही धावले आहे. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या समितीने महाराष्ट्रातील रस्ते पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यात राष्ट्रीय महामार्ग-१६० एच्या घोटी-त्र्यंबक (मोखाडा)-जव्हार-मानोर-+पालघर या १५४.६३५ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यास सरकारने मंजुरी दिली आहे.



२०२७ मध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील रस्त्यांचा विकास, नवीन रस्ते या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. त्यासाठी निधी मंजूर करण्यात येत आहे. नाशिक सिंहस्थ परिक्रमा मार्ग (रिंगरोड) लवकरात लवकर तयार करण्यासाठी भूसंपादन करण्यात येत आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येत आहे. याशिवाय घोटी-त्र्यंबकेश्वर रस्त्याचे रुंदीकरणही प्रस्तावित आहे. असे सर्व काही होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाच्या समितीने महाराष्ट्रातील रस्ते पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी काही निर्णय घेतले. त्यात नाशिकशी संबंधित निर्णयाचाही समावेश असल्याने नाशिकशी जोडणारे रस्ते आता चौपदरी किंवा सहापदरी राहणार हे निश्चित. नाशिकच्या पश्चिम भागातील अंबड आणि सातपूरसारख्या औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या मालवाहतुकीमुळे सध्या नाशिक शहरावर वाहतुकीचा मोठा ताण येत आहे. सध्याची ही वाहतूक एनएच-८४८ महामार्गमार्गे शहरातून जात असल्याने नागरी रस्त्यांना कोंडीचा सामना करावा लागत आहे. या नवीन प्रकल्पामुळे त्र्यंबकमार्गे औद्योगिक क्षेत्रांना एक सक्षम पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे नाशिकमधील वाहतुकीचा ओघ कमी होईल. विशेषतः मुंबई आणि दक्षिणेकडून येणारी वाहतूक इगतपुरी इंटरचेंजद्वारे समृद्धी महामार्ग आणि पुढे एनएच-१६० ए चा वापर करून त्र्यंबकेश्वर आणि नाशिककडे जलद गतीने पोहोचू शकेल.

हा प्रकल्प पीएम गतीशक्ती तत्त्वावर आधारित असून, याद्वारे महाराष्ट्रातील ६ आर्थिक केंद्र, ७ सामाजिक केंद्र आणि ८ लॉजिस्टिक केंद्र जोडले जाणार आहेत. यात प्रामुख्याने तारापूर आणि बोईसर येथील सेझ (एऐ), मोखाडा औद्योगिक उद्यान आणि वाडा येथील औद्योगिक वसाहतींचा समावेश आहे. तसेच त्र्यंबकेश्वर, जव्हार राजवाडा, वैतरणा नदी आणि अर्नाळा किल्ला यासारख्या पर्यटन स्थळांनाही या महामार्गाचा मोठा लाभ मिळेल.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील पायाभूत सुविधा सुधारल्यामुळे या क्षेत्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला मोठी गती मिळणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रवासाचा वेळ आणि वाहनांच्या देखभालीचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होईल. तसेच या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात सुमारे ४४ लाखांहून अधिक व्यक्ती-दिवसांचा रोजगार निर्माण होणार आहे. हा महामार्ग पुढे दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वे आणि वाढवण बंदरासारख्या महत्त्वाच्या केंद्रांशी जोडला जाणार असल्याने राज्याच्या लॉजिस्टिक कामगिरीत मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

महासागर भंडारा
सोमवार १६ फेब्रुवारी २०२६
पान ३

## जामा मस्जिद व सौदागर मोहल्ला मस्जिद ट्रस्टच्या वतीने सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि. १५ फेब्रुवारी:** जामा मस्जिद व सौदागर मोहल्ला मस्जिद ट्रस्ट भंडारा यांच्या संयुक्त विद्यमानाने वतीने ट्रस्ट कार्यालयात सत्कार सोहळा नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामा मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष जनाब अतहर परवेज पटेल होते. त्यावेळी ट्रस्टचे सचिव जनाब अ. रशीद (निसार) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष जनाब अतहर परवेज पटेल, सचिव जनाब अ. रशीद (निसार), उपाध्यक्ष जनाब मो. मुश्ताक (बल्लि), सहसचिव जनाब हाफीज इमरान अली, सदस्य जनाब सैय्यद शकील, जनाब अनिसउद्दीन खान, जनाब हाफीज मोहसीन काझी, जनाब मन्शाउर्रहमान खान, जनाब इकरा मुरहीम खान, जनाब एजाज बेग इत्यादी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भंडारा नगरपरिषदेचे नगरसेवक हाजी मोहम्मद मुस्ताक (बल्लिभाई) तसेच हुजूर पाक यांचा रोजा-ए-अक़्दसची पाहणी व उमरा अदा करून परत आलेले अशरफ भाई यांचे शाल, गुलदस्ता देऊन स्वागत व अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर नवाज यांनी केले.

## राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत श्री अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनामुळे खा.प्रफुल पटेल यांचा वाढदिवस साजरा होणार नाही

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि. १५ फेब्रुवारी:** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उप मुख्यमंत्री दिवंगत श्री अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनामुळे या शोक दरम्यान आगामी १६ व १७ फेब्रुवारी ला येणारा वाढदिवसानिमित्त कसल्याही प्रकारचे शुभकामना बॅनर, जाहिरात किंवा कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येवू नये.

ही सर्व कार्यकर्ता, पदाधिकारी मित्र परिवाराला विनंती. आहे असे आवाहन मा.खासदार प्रफुल पटेल, सौ. वर्षा प्रफुल पटेल यांनी कळविले आहे.

# करडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ठरली पांढरा हत्ती

## पाच गावांना पाण्याची प्रतीक्षा

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी दि. १५ फेब्रुवारी :** तालुक्यातील करडी जिल्हा परिषद क्षेत्रामधील करडी , निलज खुर्द , निलज बू. , नवेगाव , मोहगाव आदी गावातील नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे या हेतूने तयार करण्यात आलेली करडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना २० वर्षापासून बंद आहे. परिणामी संपूर्ण योजनाच भंगारात निघाली असून करोडो रुपयांचा खर्च वाया जात आहे. केवळ ठेकेदाराचे व अधिकाऱ्यांचे पोट भरणारी ही योजना करडी क्षेत्रासाठी पांढरा हत्ती ठरली आहे. करडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना देव्हाडा साखर कारखान्या जवळील परिसरात करोडो रुपये खर्चून तयार करण्यात आली. पाणी पुरवठा योजनेचे संपूर्ण काम देखील पूर्ण झाले असताना २० वर्षा नंतरही नागरिकांना पाणी मिळालेले नाही. आणि ती योजना भंगार अवस्थेत खितपत पडलेली आहे.

करडी प्रादेशिक पाणी पुरवठा योजने अंतर्गत पाच गावांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळवून देण्यासाठी पाण्याची टाकी , पाणी फिल्टर प्लांट व ईमारत तसेच नदी पासून टाकी पर्यंत पाईप लाईन आणि टाकी पासून करडी गावा पर्यंत पाईप लाईन पूर्ण करण्यात आली आहे.



तरी देखील पाणी पुरवठा योजना सुरू करण्यात आलेली नाही . यावरील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अद्याप पगार मिळालेले नाहीत. पगारासाठी कर्मचाऱ्यांनी अनेकदा अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे उंबरठे झिजवीले आहेत. भंडारा जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री नाना पंचबुधे असताना सदर नळ योजना कार्यान्वित झाली होती. या योजनेच्या माध्यमातून करडी , निलज खुर्द , निलज बु. नवेगाव , मोहगाव येथील नागरिकांसाठी ही योजना वरदान ठरेल , असे वाटले होते. परंतु पाणी पुरवठा विभागाने याकडे दुर्लक्ष केले आहे. ही योजना चालविण्यासाठी शिखर समिती गठित करण्यात आली होती. या समितीच्या अध्यक्षपदी उपेश् बांते यांची निवड करण्यात आली होती. तरी सुद्धा प्रश्न मार्गी लागला नाही. त्यामुळे करोडो रुपयांची नळ योजना २० वर्षा पासून शोभेची वास्तू बनलेली आहे.

### पाचही गावात स्वतंत्र योजना

नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे म्हणून तत्कालीन जि. प. सदस्य महेंद्र शेंडे यांनी जिल्हा परिषद पाणी पुरवठा योजने अंतर्गत प्रत्येक गावात स्वतंत्र नळ योजना मिळावी यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे आता पाचही गावात स्वतंत्र पाणी पुरवठा योजना देण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेचे काम संपल्यात जमा झाले आहे.

योजना नव्याने सुरू झाल्यास करडी परीसरातील गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध होईल व पाण्यासाठी वणवण भटकावे लागणार नाही.

# शाळेत प्रवेश नसतानाही विद्यार्थिनीच्या नावावर शिष्यवृत्ती अर्ज

## पोलिस स्टेशन मध्ये तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी दि. १५ फेब्रुवारी:** येथील विक्तुजी कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थिनीच्या शैक्षणिक कागदपत्राचा वापर केला. तिच्या नावावर शासनाकडे शिष्यवृत्ती अर्ज भरल्याचा आरोप समोर आला आहे. याप्रकरणी विद्यार्थिनीने मोहाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

कशिश बळीराम घुगेकर या विद्यार्थिनीने मोहाडी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी नुसार तिने २९ जुलै २०२३ ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत मोहाडी येथील विक्तूजी कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे बी .एससी (सीबीझेड) प्रथम वर्षाचे शिक्षण घेतले होते . त्यानंतर आगस्ट २०२४ मध्ये तिने महाविद्यालयातून प्रवेश रद्द करण्यासाठी अर्ज केला होता. १५ ऑक्टोंबर २०२४ रोजी तिचे मूळ स्थानांतरण प्रमाणपत्र (टी.सी) परत मिळाल्या नंतर तिने दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेतला. सध्या ती तेथे नियमित शिक्षण घेत आहे. मात्र , आपण त्या काळात विक्तुजी महाविद्यालयात शिक्षण घेत नसतानाही संबंधित महाविद्यालयाने तिच्या शैक्षणिक कागद पत्राच्या आधारे शासनाकडे शिष्यवृत्तीचा अर्ज भरल्याचा आरोप तिने तक्रारीत केला आहे. तक्रारीनुसार विद्यार्थिनीच्या नावावर शिष्यवृत्ती अर्ज भरताना महाविद्यालयातील संस्थाचालक व कर्मचारी यांनी संगनमताने तिची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती वापरली. त्यामुळे शासनाची फसवणूक झाली असून स्वतःच्या नावाचा व कागदपत्राचा गैरवापर झाल्याने आपल्याला मानसिक त्रासासह शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही तिने नमूद केले आहे. प्रकरणी गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करावी , अशी मागणी विद्यार्थिनीने पोलिसाकडे केली आहे.

### ईतराबाबतही घडले का

अशाच प्रकारे ईतर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कागदपत्राचा गैरवापर झाला आहे का , याचीही चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाची नोंद मोहाडी पोलिस ठाण्यात घेण्यात आली आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्मिळ 'होन' भंडाऱ्याच्या सार्वजनिक वाचनालयात

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि. १५ फेब्रुवारी:** जिल्ह्यातील सर्वात जुन्या व वाचन संस्कृतीची वैभवशाली परंपरा जपणाऱ्या गांधी चौक भंडारा येथील सार्वजनिक वाचनालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्मिळ सोन्याचे 'होन' हे नाणे संग्रही सापडले आहे.

सार्वजनिक वाचनालय भंडारा येथील तिजोरीत सापडलेल्या 'होन' या नाण्याच्या एका बाजूवर 'श्री राजा शिव' अशी अक्षरे नमूद असून दुसऱ्या बाजूवर 'छत्रपति' असा मजकूर आहे. काही मजकूर एका कागदावर छापलेला आहे. यात लिहिलेले आहे की 'शिवाजी महाराजांचे फक्त सहा होन आतापर्यंत उपलब्ध झाले असून हे नाणे फार दुर्मिळ आहे. एक होन राष्ट्रीय संग्रहालय नवी दिल्ली येथे असून एक मुंबईत प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममध्ये आहे?.'

'होन' हे दुर्मिळ नाणे असलेल्या बाजूला हाच मजकूर इंग्रजीत छापलेला आहे. त्या खाली हे 'होन' सोन्याचे असल्याचे नमूद केलेले आहे. या नाण्याचे वजन २.८४९० ग्रॅम्स, व्यास १.२ सेंटीमीटर असे इंग्रजी व मराठीत छापलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाच्या वेळी १६७४ ला महाराजांनी चलनात आणलेल्या व भंडाऱ्यातील सार्वजनिक वाचनालयात असलेल्या या छत्रपती शिवरायांच्या 'होन' बद्दलची माहिती देतांना सार्वजनिक वाचनालय भंडाराचे अध्यक्ष धनंजय दलाल यांनी सांगितले की '१६४ वर्षाची वाचन परंपरा असलेले हे वाचनालय सुरुवातीला दुसऱ्या इमारतीत होते. माजी आमदार व या वाचनालयाच्या नवीन वास्तुचे शिल्पकार भाऊसाहेब दलाल यांनी नवीन इमारतीत खूप वर्षापासून या वाचनालयाचा भाग असलेली जुनी तिजोरी लावली. मात्र ही तिजोरी उघडण्यात आली नव्हती कारण या जुन्या तिजोरीच्या किल्ल्या नव्हत्या शेवटी उत्सुकतेपोटी या तिजोरीची किल्ली तयार करून ही तिजोरी काही महिन्यापूर्वी उघडण्यात आली. तेव्हा या तिजोरीच्या आत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी महाराजांनी चलनात आणलेले ऐतिहासिक व दुर्मिळ 'होन' आढळले. छत्रपती शिवरायांचा हा अमूल्य दुर्मिळ ठेवा वाचनालयाच्या तिजोरीत कसा आला याचा अद्याप इतिहास समजलेला नाही. पुरातत्व विभागाने या विषयीचा अधिक खुलासा करावा अशी विनंती सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल यांनी केली आहे. हे शिवकालीन दुर्मिळ 'होन' शिवप्रेमींना पाहण्यासाठी सार्वजनिक वाचनालय भंडारा येथे ठेवण्यात आले आहे असेही त्यांनी सांगितले.



सार्वजनिक वाचनालय भंडारा येथे असलेले हे ते 'होन'

# तुमसर - बपेरा मार्गावर खड्डे अद्यापही कायम

## नागरिकांमध्ये रोष दुरुस्तीचे काम अर्धवट ; सबंधित विभागाचे दुर्लक्ष

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा दि. १५ फेब्रुवारी:** तुमसर-बपेरा महामार्गाच्या दुरवस्थेविरोधात जनतेने छेडलेल्या आंदोलनानंतर प्रशासनाला जणू जाग आली; मात्र ही जाग केवळ औपचारिक ठरल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. आंदोलनाच्या धसक्याने संबंधित विभागाने रस्ता दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केल्याचे दाखवून दिले; पण प्रत्यक्षात हे काम केवळ थातूरमातूर स्वरूपाचे ठरले. मार्गावरील तब्बल दोन हजारांहून अधिक लहान-मोठे खड्डे दुर्लक्षित ठेवून केवळ काही ठिकाणी मलमपट्टी करण्यात आली आणि त्यानंतर यंत्रणा घटनास्थळावरून पसार झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून हा महामार्ग मृत्यूचा सापळा ठरला होता. सतत होत असलेल्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते विनेश गजभिये आणि राजेंद्र बघेले यांनी उपोषण सुरू केले होते. त्यांच्या आंदोलनाला परिसरातील नागरिकांचा मोठा पाठिंबा लाभला. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन आमदार राजू कारेमोरे यांनी मध्यस्थी केली. प्रशासनाकडून मंगळवारी (दि. १० फेब्रुवारी) पासून प्रत्यक्ष काम सुरू करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, कामाला सुरुवात



झाल्यानंतर प्रशासनाचा खरा चेहरा समोर आल्याची टीका होत आहे. महामार्गावर असंख्य जीवघेणे खड्डे असताना संबंधित विभागाने केवळ काही मोठ्या खड्ड्यांवर डांबर टाकून काम उरकले. वाहनचालकांसाठी तितकेच धोकादायक ठरणारे दोन हजारांहून अधिक लहान खड्डे मात्र तसेच सोडण्यात आले. परिणामी, रस्ता पूर्ववत सुरक्षित झाला नसून अपघातांचा धोका कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दुरुस्तीचे काम पूर्णत्वास न नेता अर्धवट अवस्थेतच यंत्रणा माघारी परतल्याचे दिसून येते. यामुळे नागरिकांमध्ये पुन्हा एकदा तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे जर जनतेचा बळी गेला, तर ते सहन केले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा स्थानिक लोकप्रतिनिधींनी यापूर्वी दिला होता. तरीही अधिकाऱ्यांकडून दिलेला शब्द पाळण्यात आलेला नाही.

**प्रशासनाकडून डोळ्यात धूळफेक :** रस्ता दुरुस्तीचे काम दर्जेदार पद्धतीने, तांत्रिक निकष पाळून आणि संपूर्ण क्षमतेने व्हावे, अशी नागरिकांची माफक अपेक्षा होती. मात्र, प्रशासनाने केवळ डोळ्यात धूळफेक केल्याचा आरोप होत आहे. अर्धवट आणि निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अपघातांची मालिका थांबण्याऐवजी आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जर उर्वरित सर्व खड्डे तातडीने बुजवून संपूर्ण मार्गाची चांगली दुरुस्ती करण्यात आली नाही, तर शांत झालेले आंदोलन पुन्हा अधिक तीव्र स्वरूपात उभे राहील, असा खणखणीत इशारा परिसरातील सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांसह नागरिकांनी दिला आहे.

## नवनिर्वाचित नगरसेवक व नगराध्यक्ष यांचा सत्कार




**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. १५ फेब्रुवारी:** श्री संताजी बहुउद्देशीय सेवा मंडळ भंडारा, यांच्याद्वारे तेली समाजातील नवनिर्वाचित जिल्हास्तरीय नगराध्यक्ष व नगरसेवकांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन दिनांक १० फेब्रुवारी २०१६ ला दुपारी १२.०० वाजता राजस्थानी भवन भंडारा येथे आयोजन केले होते. प्रमुख पाहुणे म्हणून रामदासजी शहारे, विलास भाऊ काटेखाये, सोमदत्तजी करंजेकर, बाळकृष्ण सेलूकर, बाळकृष्ण नागोसेजी व बहुसंख्येने समाजातील प्रतिष्ठित लोक यांच्या उपस्थितीमध्ये नवनिर्वाचित नगरसेवक तथा गटनेते श्री इंजि. संदीप बावनकुळे यांच्या सत्कार करण्यात आला .

# नासाच्या ऐतिहासिक 'आर्टेमिस' मोहिमेत साकोलीच्या नवजीवन विद्यालयाची मोहोर; ५४ वर्षानंतर विद्यार्थ्यांची नावे जाणार चंद्रावर

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि. १५ फेब्रुवारी:** तब्बल ५४ वर्षाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अमेरिकेची अंतराळ संस्था 'नासा' (NASA) पुन्हा एकदा मानवाला चंद्रावर पाठवण्याची तयारी करत आहे.

या ऐतिहासिक 'आर्टेमिस' मोहिमेत साकोली तालुक्यातील नवजीवन विद्यालय अँड ज्युनिअर सायन्स कॉलेज, जमनापूर येथील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवत एक नवा इतिहास रचला आहे.

या विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी 'व्हर्च्युअल गेस्ट' म्हणून आपली नावे नासाच्या अधिकृत पोर्टलद्वारे चंद्रावर पाठवली आहेत.



नासाच्या या महत्त्वाकांक्षी मोहिमेद्वारे चार अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावर उतरणार आहेत.

या अंतराळवीरांसोबत जगातील लाखो लोकांची नावे एका मायक्रोचिपमध्ये साठवून चंद्रावर पाठवली जाणार आहेत. या ऐतिहासिक क्षणाचा भाग होण्यासाठी नवजीवन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विशेष पुढाकार घेतला. शाळेचे मुख्याध्यापक डॉ. लोकानंद नवखरे आणि विज्ञान शिक्षक मुकेश येसनसुरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी व शाळेतील शिक्षक दिलीप चौधरी, प्रकाश बडवाईक, अमोल वाकडे, प्रीती साखरे, अर्चना नवखरे, अल्का गोंधळे या मोहिमेत नाव नोंदणी केली आहे. आपल्या शाळेचे नाव चंद्रावर जाणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अंतराळ विज्ञानाविषयी आवड निर्माण होण्यास मदत होणार आहे.

> 'ही आमच्या शाळेसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. अंतराळ संशोधनाशी जोडले जाण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाल्याने त्यांचे मनोबल वाढले आहे.'
>
> **डॉ. लोकानंद नवखरे मुख्याध्यापक, नवजीवन विद्यालय, जमनापूर.**
>
> ही आर्टेमिस-२ मोहीम एप्रिल २०२६ पूर्वी फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटर येथून प्रक्षेपित होणार आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चंद्राच्या पलीकडे सुमारे ६ लाख ५४ हजार मैलांचा प्रवास करून प्रशांत महासागरात परतणार आहेत. अशा प्रकारे, साकोलीच्या ग्रामीण भागातील या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावरील अंतराळ मोहिमेत सहभागी होऊन एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितीत हृदय विकाराच्या झटक्याने व्यापाऱ्याचा मृत्यू

### मार्केट यार्डात शोककळा

**महासागर प्रतिनिधी**

**तुमसर दि. १५ फेब्रुवारी:** तुमसर कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात शनिवारी १४ फेब्रुवारी रोजी दुपारी घडलेल्या घटनेने व्यापारी व शेतकरी वर्गात एकच खळबळ उडाली आहे. ज्येष्ठ अडते व्यापारी डुलीचंद निखाडे (वय ६०) यांचा सार्वजनिक बाथरूममध्ये संशयास्पद परिस्थितीत मृतदेह आढळून आले. सदर घटनेमुळे संपूर्ण मार्केट यार्ड परिसरात शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, निखाडे हे दररोज प्रमाणे सकाळी सुमारे ८.०० वाजता आपल्या दुकानात आले होते. काही वेळानंतर ते लघुशंकेसाठी मार्केट यार्डातील सार्वजनिक स्वच्छतागृहात गेले. बराच वेळ उलटूनही ते बाहेर न आल्याने काही हमाल व व्यापाऱ्यांनी पाहणी केली असता ते आतमध्ये निपचित अवस्थेत आढळले. सदर घटनेची बातमी परिसरात पसरली असता मोठ्या संख्येने व्यापारी, हमाल व शेतकरी घटनास्थळी जमा झाले. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक चर्चेनुसार हृदयविकाराचा झटका असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

दरम्यान, काही व्यापाऱ्यांकडून निखाडे यांना मद्यपानाचे व्यसन असल्याची अनौपचारिक चर्चा सुरू आहे. तथापि, यासंदर्भात कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही. या घटनेमुळे बाजार समितीतील व्यवहार काही काळ विस्कळीत झाले होते. दुलीचंद निखाडे यांच्या निधनाने व्यापारी वर्तुळात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# मानव धर्मामुळे दुःखी कुटुंबाचा उद्धार झाला - लता बुरडे

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी दि. १५ फेब्रुवारी:** महानत्यागी बाबा जुमदेवजीनी अहोरात्र परिश्रम करून दुःखी व कष्टी कुटुंबाला सुखाचा मार्ग दाखविला. मानव धर्मामुळे अनेक दुःखी कुटुंबाचा उद्धार झाला. बाबांनी चार तत्व, तीन शब्द, पाच नियमाची शिकवण सर्व सेवकांना दिली. अंधश्रद्धा तसेच व्यसनाने त्रासलेल्या कुटूंबाला योग्य मार्गदर्शन देऊन योग्य दिशा दाखविण्याचे कार्य महानत्यागी बाबा जुमदेवजीनी केले. शासनाला व्यसनमुक्त समाज करण्यास अपयश आले. मात्र महानत्यागी बाबा जुमदेवजीनी ते शीकवणीच्या माध्यमातून करून दाखविले. मानवधर्माची एक मोठी ओळख तयार झाली. मानवधर्माला अश्या वेळी साथ दिली पाहिजे , तरच सेवकांची प्रगती होईल. बाबांनी दिलेल्या शिकवणीचे पालन करणारा कुटुंब समाधानाने जीवन जगत आहे.




राजकीय नेत्यांनी व्यसनमुक्त समाज करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. व्यसनमुक्त समाज घडला पाहिजे. समाजातील अंधश्रद्धा दूर झाली पाहिजे. आपली मुले शिक्षण घेऊन मोठी झाली पाहिजेत. त्यांनी पण समाजाची सेवा केली पाहिजे. तरच देशातील अंधश्रद्धा व व्यसनमुक्त समाज परत मानव धर्माच्या माध्यमातून पाहायला मिळेल , असे मोलाचे मार्गदर्शन कार्यक्रमाच्या उद्घाटीका आध्यात्मिक प्रमुख तथा मानव धर्म प्रचार व प्रसारीका लता बुरडे यांनी केले. त्या कांद्री येथे आयोजित भव्य सेवक संमेलना प्रसंगी उपस्थित होत्या.

तर अध्यक्षस्थानी शिक्षण व बांधकाम सभापती नरेश ईश्वरकर होते. सत्कारमूर्ती म्हणून बहुउद्देशीय परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळाचे माजी अध्यक्ष यशवंतराव ठबाले होते.

प्रमुख अतिथी म्हणून उपाध्यक्ष देवचंद सेलोकर, सचिव युवराज गलबले, कोषाध्यक्ष राकेश लील्हारे, सहसचिव रोहित शेंडे, संचालक रामनरेश बोंदरे, सहादेव लुटे , अशोक बोंदरे , हितेश ढोबळे , विजय निमकर , शालू निंबारते, मोरेश्वर सार्वे , व्यवस्थापक भगवान पिलारे, ज्येष्ठ मार्गदर्शक रघु पिलारे , इंद्रपाल मते, लक्ष्मण माहूले व परिसरातील मार्गदर्शक उपस्थित होते .

सर्वप्रथम प्रमुख मान्यवराच्या शुभहस्ते बाबा जुमदेवजी, बाबा हनुमानजी , आई वाराणशी यांच्या फोटोचे पूजन करून दिप प्रज्वलित करण्यात आले. त्यानंतर शोभायात्रेत सहभागी झाकीना बक्षीस वितरण करण्यात आले. सेवक संमेलनाला प्रत्येक गावातील सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परमपूज्य परमात्मा एक सेवक मानव जागृती संस्था काद्रीच्या संचालक , सदस्यांनी व सेवकांनी सहकार्य केले.

## सिंदपुरीत 'कृषी यांत्रिकीकरण' विषयावर अग्रोवन कृषिसंवाद कार्यक्रम संपन्न

**प्रतिनिधी**


**सिहोरा :** दिवसेंदिवस शेती क्षेत्रात मजूर टंचाईची समस्या तीव्र होत असून, त्यावर प्रभावी उपाय म्हणून कृषी यांत्रिकीकरण अत्यंत गरजेचे आहे. शेती विकासासाठी शासनाच्या विविध यांत्रिकीकरण योजनांची माहिती शेतकऱ्यांनी जाणून घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन कृषी सहाय्यक हर्षविना पडारे मॅडम यांनी केले.

तुमसर ऑइल प्रोसेस शेतकरी उत्पादक कंपनी, बायोगॅस युनिट, सिंदपुरी (ता. तुमसर) येथे 'अग्रोवन' व भंडारा येथील जॉन डिअर ट्रॅक्टरचे डीलर आदित्य एजन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'कृषी यांत्रिकीकरण' या विषयावर अग्रोवन कृषिसंवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्यांनी शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनात सकाळ अग्रोवन वृत्तपत्राचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास कृषी सहाय्यक हर्षविना पढारे, प्रमोद पाटील, क्षेत्रीय व्यवस्थापक, जॉन डिअर ट्रॅक्टर इंडिया प्रा. लि., दिनेश टोंगे, विदर्भ वितरण व्यवस्थापक, सकाळ अग्रोवन, नीरजकुमार बैस, संचालक, आदित्य एजन्सी (जॉन डिअर ट्रॅक्टर डीलर, भंडारा), आदित्य बैस, तसेच तुमसर ऑइल प्रोसेस शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक रविशंकर रहांगडाले आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

शेती क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे गोंदेखारी येथील शेतकरी श्री. बोपचे, जे गेल्या तीन वर्षांपासून संपूर्ण सेंद्रिय पद्धतीने शेती करून उत्पादन खर्च कमी करत आहेत, यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमोद पाटील व नीरजकुमार बैस यांनी जॉन डिअर ट्रॅक्टर व आधुनिक शेती यांत्रिकीकरणाबाबत शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच दिनेश टोंगे यांनी सकाळ अग्रोवन वृत्तपत्र शेतकऱ्यांसाठी कसे उपयुक्त आहे, याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन लक्ष्मीकांत तोरणकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन रविशंकर रहांगडाले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अग्रोवन प्रतिनिधी नवीन कामठे तसेच शेतकरी उत्पादक कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला चुल्हाड- सिहोरा परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

# फोर स्टार्सच्या वादळात संवादाचा अभाव






माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी लिहिलेल्या फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी या आत्मचरित्राने संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रचंड वादळ निर्माण केले. सरकार आणि प्रकाशकांच्या म्हणण्यानुसार हे पुस्तक प्रकाशितच झालेले नाही. अप्रकाशित असलेले पण सैन्य दलातील एका उच्चपदस्थाने निवृत्तीनंतर लिहिलेले पुस्तक देशभर सुत्नामी निर्माण करील याची कल्पनाही कुणी केली नव्हती. संसदेच्या पहिल्या टप्प्यातील अधिवेशन निवृत्त जनरल नरवणे यांच्या फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी या पुस्तकाभोवतीच फिरत राहिले. विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी या पुस्तकावरून सरकारवर आक्रमकपणे नेटाने हल्ले चढवले. पण अप्रकाशित पुस्तकावर बोलता येणार नाही, अशी सरकारने ताठर भूमिका घेतली. लोकसभा अध्यक्षही विरोधीपक्ष नेत्याला संसदेत बोलूच देत नाहीत यावरून भाजपा विरूध्द काँग्रेस असा संघर्ष टोकाला पोचला. जनरल नरवणे यांचे पुस्तक हातात घेऊन आणि उंचावबून दाखवत आपणास हे पुस्तक पंतप्रधानांना भेट द्यायचे आहे, असे राहुल गांधींनी म्हटले खरे. पण त्यानंतर पंतप्रधान सभागृहात आलेच नाहीत आणि फोर स्टार्स ऑफ डेस्टिनीवरून निर्माण झालेले वादळ थांबले नाही,

विरोधी पक्षनेत्याला सभागृहात बोलू दिले जात नाही म्हणून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यावर विरोधी पक्षाच्या १२० खासदारांनी स्वाक्षऱ्या करून अविश्वास ठराव दाखल केला. तर पुरावे नसताना राहुल गांधी सरकारची बदनामी करतात, जगात देशाची नाचक्की करतात असे कारण सांगत भाजपाच्या निशिकांत दुबे यांनी राहुल गांधींचे खासदार म्हणून सदस्यत्वच रद्द करावे व त्यांना निवडणूक लढविण्यास बंदी घालावी, अशी मागणी करणारी नोटीस लोकसभा अध्यक्षांना दिली आहे.

पेग्विन रँडम हाऊस इंडिया या प्रकाशन संस्थेने जनरल नरवणे यांचे पुस्तक छापून तयार केले आहे. प्रकाशनाचे सर्व हक्क पेग्विन कडे आहेत. कोणताही भाग सार्वजनिक केलेला नाही, असा दावा पेग्विन प्रकाशन संस्थेने केला आहे. निवृत्त लष्कर प्रमुखांनी आपले आत्मचरित्र लिहून प्रकाशकाकडे दिले व त्याच्या प्रकाशनासाठी संरक्षण मंत्रालयाकडून संमती मिळविणे हे काम पेग्विन प्रकाशन संस्थेचे आहे. गेली दिड-दोन वर्षे हे पुस्तक संरक्षण मंत्रालयाकडे संमती मिळावी यासाठी पडून आहे. एवढ्या काळात या पुस्तकाला सरकारने संमती का दिली नाही ? जर या पुस्तकात काही आक्षेपार्ह असेल तर तो भाग वगळावा असे सरकारने का सांगितले नाही ? जर सुरक्षितता व गोपनियता या दृष्टीकोनातून हे पुस्तक सार्वजनिक करणे सरकारला योग्य वाटत नसेल तर सरकार प्रकाशनाला परवानगी का नाकारत नाही ? गेल्या दोन वर्षात होकार किंवा नकार असा कोणताही निर्णय सरकारने घेतलेला नाही. गेल्या पाच वर्षात सरकारकडे ३५ पुस्तके परवानगीसाठी सादर होती.

**राष्ट्रनामा**



**सुकृत खांडेकर**
**०९५९४२२४०००**
sukritforyou@gmail.com

चौस्तीस पुस्तकांना सरकारने संमती दिली. मग जनरल नरवणे यांचे फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी हे पुस्तक का रखडले आहे ?

सन २०२० मधे लडाख जवळील गलवान खोऱ्यात चिनी सैन्यासोबत भारतीय जवानांची झालेली झटापट किंवा चार रणगाडयांसह चिनी सैन्याने भारतीय सरहद्दीकडे केलेला घुसण्याचा प्रयत्न यावेळी जनरल नरवणे हेच लष्कराचे प्रमुख होते. वरिष्ठांकडून आदेश आल्याशिवाय चिनी सैन्यावर गोळीबार करायचा नाही, असे कायम स्वरूपी आदेश भारतीय सैन्याला देण्यात आलेले आहेत. लष्करप्रमुख म्हणून सरहद्दीवरील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चिनी सैन्य रणगाड्यांसह चाल करून भारताच्या दिशेने येत आहे असे कळवल्यावर जनरल नरवणे यांनी तातडीने संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल यांच्याशी संपर्क साधून अशा परिस्थितीत सैन्याने काय करायचे याचे आदेश मागितले. अडिच तासात त्यांनी या सर्व दिग्गजांशी दोन वेळा संपर्क साधला. पण तत्काळ प्रतिसाद मिळाला नाही. रात्री साडे दहा वाजता, जो उचित लगे वो किजीए, असे पंतप्रधानांनी म्हटले असल्याचे संरक्षणमंत्र्यांनी लष्करप्रमुखांना कळवले. हा वृत्तांत या पुस्तकांत नरवणे यांनी मांडला आहे म्हणे. शत्रूचे सैन्य रणगाड्यांसह देशावर चाल करून येत असताना, माझ्या हातात संबंधितांनी गरम बटाटा दिला अशी त्यांची अवस्था झाली असा त्यांनीच उल्लेख केला आहे म्हणे.

योग्य वाटेल तो निर्णय तुम्हीच घ्या असे सांगणे हे सरकारने लष्करप्रमुखांना दिलेले निर्णय स्वातंत्र होते का ? संरक्षण मंत्रालयाकडून अंतिम मंजुरी मिळेपर्यंत सेवेतील किंवा निवृत्त लष्करी अधिकाऱ्याने केलेले लिखाण प्रसिध्द करता येत नाही हा नियम आहे. मग नरवणे यांचे पुस्तक बाजारात कसे गेले ? त्या पुस्तकाची पीडीएफ सोशल मिडियावर उपलब्ध कशी ? स्वत: नरवणे आपले पुस्तक वाचा व आनंद घ्या, असे आवाहन कसे करू शकतात ? मंत्र्यांची नावे, त्यांच्याशी झालेले संभाषण आणि वेळा हे लष्करप्रमुखाने प्रसिध्द करणे योग्य आहे का ? निर्णयाला विलंब होण्यास सरकारच दोषी आहे, असा समज निर्माण करणे शिस्तीला धरून आहे का, असे अनेक प्रश्न या निमित्ताने पुढे आले आहेत.

पुस्तक प्रकाशित की अप्रकाशित याची दिल्ली पोलीस चौकशी करीत आहेत. राहुल गांधी विरोधी पक्षनेता म्हणून ज्या पुस्तकाचा दाखला देऊन बोलत होते ते खरे की खोटे हे सरकारला सांगता आले नसते का? राहुल यांनी नुसते प्रधानमंत्रीजी असा शब्द उच्चारला की त्यांना बोलण्यापासून रोखले जात होते. लष्करप्रमुखांच्या शहाणपणावर आमचा विश्वास आहे हेच जर सरकारला सांगायचे होते तर मग त्यासाठी अडिच तास का लागले? अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना १९९९ मधे कारगिल युध्द घडले. त्यावेळी पंतप्रधान वाजपेयी यांनी कारवाईसाठी लष्कराला पूर्ण सूट दिली होती. त्यावेळी ते लष्करप्रमुख पदमनाभन यांच्या संपर्कात नियमित होते. १९७१ च्या पाकिस्तान युध्दाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी लष्करप्रमुख अरोरांच्या संपर्कात होत्या. जेव्हा लष्करप्रमुख नरवणे माझ्यासाठी काय आदेश आहे, असे विचारात तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य व तातडी लक्षात घेऊन त्यांना सरकारचा निर्णय विनाविलंब कळवायला नको का ? शत्रूचे सैन्य चालून येत असताना, प्रतिकार कसा करायचा, पर्याय कोणकोणते आहेत, युध्द दीर्घकालीन चालू रहाणार असेल तर शस्त्रपुरवठा, रसद, दारूगोळा, अन्नधान्य, विविध बाबींवर होणारा खर्च याची तयारी आहे का, युध्द सुरू झाले तर राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय परिणाम काय होतील या विचार सरकारने करायचा असतो. जनरल नरवणे यांच्या पुस्तकातील काही मजकूर करेव्हान मासिकाने प्रसिध्द केला होता, तोच राहुल गांधी वाचून दाखविण्याचा प्रयत्न करीत होते, मासिकात काहीही छापून येते असे सत्ताधारी बाकांवरून एका नेत्याने सांगताच दुसऱ्या दिवशी राहुल गांधी फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी हे पुस्तकच घेऊन संसद भवनात आले. सेनादलाला शक्ति व नैतिक सामर्थ्य देण्याचे काम सरकारने करायचे असते. पण या मुद्द्यावर सरकारने आली भूमिका मांडलीच नाही. अग्निपथ योजनेला सेनादलाचा विरोध होता ही बाबही या पुस्तकात असल्याची चर्चा आहे. पुस्तकावर संसदेत चर्चा झाली असती तर यापुढे चुकीचे काही घडू नये असा संदेश मिळाला असता. सरकारची भूमिका ऐकून जनतेला वास्तव समजले असते. जनरल नरवणे यांच्या पुस्तकातील वादग्रस्त मुद्यांवर चर्चा का झाली नाही? आक्षेपार्ह असेल तर त्या पुस्तकावर बंदी घालण्याचा निर्णय सरकार का घेत नाही ? फोर स्टार्स ऑफ डेस्टिनीच्या वादळात संवादाचा अभाव जाणावला.

## निष्कलंक चारित्र्याचे, अजातशत्रू व्यक्तिमत्व आर आर पाटील



राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले निष्कलंक चारित्र्याचे माजी उपमख्यमंत्री रावसाहेब राजाराम पाटील उर्फ आर आर पाटील यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १६ फेब्रुवारी २०१५ रोजी आर आर पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले होते. आर आर पाटील यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला होता. आर आर पाटील म्हणजे राजकारणातील आम आदमी. शेतकरी असोत की सर्वसामान्य नागरिक, गरीब असोत की वंचित प्रत्येकाला आर आर पाटील आपले वाटत होते. राजकारणात उपमुख्यमंत्री पदासारख्या मोठ्या पदापर्यंत पोहचूनही कायम जमिनीवर राहून जनतेशी नाळ टिकवलेले आर आर पाटील सर्वसामान्यांचे नेते होते म्हणूनच त्यांना सर्वसामान्य नागरिक त्यांना प्रेमाने आबा म्हणत. १६ ऑगस्ट १९५७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील अंजनी गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात आबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती गरिबीची असल्याने आबांनी कमवा आणि शिका या योजनेतून शिक्षण घेतले. बी ए झाल्यानंतर त्यांनी एलएलएलबी चे ही शिक्षण घेतले. कॉलेज जीवनातच त्यांनी शेतकऱ्यांचे, सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न शासन दरबारी मांडायला सुरुवात केली. त्यांच्यातील नेतृत्व गुण बसंत दादा पाटलांनी हेरले आणि त्यांना राजकारणात आणले. कोणतीही राजकीय पार्शवभूमी नसताना समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द, मनाला भिडणारी भाषण शैली आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारणात बस्तान बसवले. १९७९ साली पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून आबा निवडून आले. १९७९ ते १९९० असे एकवीस वर्ष आबा जिल्हा परिषद सदस्य होते. १९९० साली आबांनी पहिल्यांदा विधानसभेची निवडणूक लढवली आणि प्रचंड मतांनी जिंकली. त्यानंतर २०१४ पर्यंतच्या विधानसभेच्या सर्व निवडणुका आबांनी जिंकल्या. १९९५ साली आबा दुसऱ्यांदा आमदार झाल्यावर राज्यात युतीचे सरकार आले. विरोधी पक्षात असलेल्या आबांनी राजकीय आयुधांचा वापर करून अनेकदा सत्तधाऱ्यांना कोंडीत पकडले. विरोधी पक्षात असूनही आबांनी विधानसभा गाजवून सोडली. १९९९ साली राष्ट्रवादीची स्थापना झाल्यावर ते राष्ट्रवादीत आले. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू साथीदार अशी त्यांची ओळख बनली. त्यांनीही राष्ट्रवादी घराघरात पोहचवण्यासाठी जीवाचे रान केले. ते काही काळ राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे अध्यक्ष होते. राज्य मंत्रिमंडळात त्यांना अनेक महत्वाची पदे मिळाली. आर आर पाटील ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारीही त्यांनी स्वीकारली. गृहमंत्री असताना त्यांनी राज्यातील डान्स बार बंद करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. डान्स बार बंद करण्याचा त्यांच्या निर्णयाला कडाडून विरोध झाला पण ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले. गृहमंत्री असतानाच त्यांनी महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान राबवले. गृहमंत्री असताना त्यांनी खाजगी सावकारी विरूध्दही दंड थोपटले होते तसेच त्यांनी गुटखा बंदी करण्याचा देखील निर्णय घेतला होता. त्यांच्या याच धडाकेबाज निर्णयांनी त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी मोठी पदे भूषवूनही आबांनी तळागळातील कार्यकर्त्यांशी असलेला संवाद तुटू दिला नाही. सत्ता येते आणि जाते जोडलेले माणसे टिकवली पाहिजेत हे आबांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. उच्च पदावर पोहचूनही आबांनी आपला साधेपणा कायम ठेवला. इतक्या मोठ्या पदावर असतानाही आबांनी आपल्या पाल्यांना महागड्या इंग्रजी शाळेत न घालता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत घातले होते. आबांसारखे तळागळातून आलेले स्वच्छ चारित्र्याचे निष्कलंक, अजातशत्रू व्यक्तिमत्व राजकारणात विरळच. सध्याच्या गढूळ राजकीय वातावरणात तर आबांसारख्या निष्कलंक चारित्र्याच्या नेत्याची आवर्जून आठवून येते. राजकारणात त्यांनी जो आदर्श घालून दिला आहे त्याचे अनुकरण आजच्या राजकीय नेत्यांनी केले तरच राजकीय नेत्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा प्राप्त होईल. आबांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## बांगलादेशमधील निवडणुकींचा अन्वयार्थ !



बांगलादेशमध्ये नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत तारिक रेहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला मोठा विजय मिळाला आहे. ३०० सदस्य असलेल्या बांगलादेश संसदेत, बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला आणि तिच्या मित्रपक्षांना २१२ जागांवर विजय मिळाला आहे.तर जमाते इस्लामी पक्षाच्या नेतृत्वाखालील अकरा पक्षांच्या आघाडीला ७७ जागांवर विजय मिळाला आहे.जुलै २०२४ मध्ये आरक्षणा विरोधात बांगलादेश मधील विद्यार्थ्यांनी जे आंदोलन पुकारले होते, त्यांनी नंतर नॅशनल सिटिझन्स पार्टी या पक्षाची स्थापना केली होती.तो पक्ष जमाते इस्लामी पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडीत सहभागी होता.त्या पक्षाला केवळ ६ जागांवर विजय मिळाला आहे.सध्या भारतात वास्तव्याला असलेल्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग या पक्षावर निवडणुकीत भाग घेण्यासाठी बंदी घालण्यात आली होती, त्यामुळे बांगलादेश मधील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेला अवामी लीग हा पक्ष निवडणुकीत सहभागी होऊ शकला नव्हता.

१९९१ पासून २०२४ पर्यंत बांगलादेश मधील सार्वत्रिक निवडणुकांत बेगम खलेदा झिया आणि बेगम शेख हसीना वाजेद या दोन बेगमांमध्येच आमनेसामने लढत होत होती.मात्र या खेपेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच या दोन्ही बेगमा निवडणुकीच्या रिंगणात दिसल्या नाहीत.कारण बेगम खलेदा झिया यांचे मध्यंतरी निधन झाले आणि ऑगस्ट २०२४ पासून बेगम शेख हसीना वाजेद या भारतात वास्तव्य करत आहेत.

सार्वत्रिक निवडणुकीत प्रचंड बहुमताने विजयी झालेल्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचे नेते तारिक रेहमान हे बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खलेदा झिया यांचे सुपुत्र आहेत.बांगलादेशचे माजी अध्यक्ष झिया उर रेहमान हे तारिक रेहमान यांचे वडील होते.झिया उर रेहमान यांनी १९७८ साली बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीची स्थापना केली होती.तारिक रेहमान हे गेली १७ वर्षे लंडनमध्ये वास्तव्यास होते.विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर,माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांनी बांगलादेशातून पलायन केल्यानंतर, तेथे सत्तेवर आलेल्या अंतरिम सरकारने, तारिक रेहमान यांच्या विरोधातील सर्व खटले मागे घेऊन,त्यांचा बांगलादेशमध्ये परतण्याचा मार्ग मोकळा केला होता.

डिसेंबर २०२५ मध्ये जेंव्हा तारिक रेहमान यांनी बांगलादेशच्या भूमिवर पाय ठेवला तेव्हा त्यांचे जे अभूतपूर्व स्वागत झाले ते पाहता बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचा बांगलादेश मधील जनमानसावर असलेला प्रभाव कमी झालेला नाही,ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली.त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित असलेल्या त्यांच्या समर्थकांची संख्या दहा लाखांच्या आसपास होती.त्यानंतर त्यांची आई आणि बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खलेदा झिया यांचे जेंव्हा निधन झाले तेंव्हा त्यांच्या अंत्ययात्रेत २० लाखांच्या आसपास पाठिराखे सहभागी झाले होते.बांगलादेशमधील जनतेचा, बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला मोठ्या प्रमाणात पाठिंबा असल्याचे त्यातून ध्वनित झाले होते.



**अभय गोखले**

या निवडणुकीत माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग हा पक्ष सहभागी होऊ शकला नाही,त्याची उणीव जाणवलीच मात्र अवामी लीगचे बालेकिल्ले राहिलेल्या भागांमध्ये या खेपेस ४० टक्यांच्या वर मतदान झाल्याने, अवामी लीगच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणात मतदानावर बहिष्कार घातलेला दिसत नाही.बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामाला विरोध करणाऱ्या जमाते इस्लामी या पक्षाने निवडणूकीत ७७ जागा जिंकून चांगली कामगिरी केली आहे.आजवरचा निवडणुकांचा इतिहास पाहता,जमाते इस्लामी या पक्षाला १८ च्या वर कधीही जागा मिळाल्या नव्हत्या.माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तर जमाते इस्लामी पक्षावर बंदी घातली होती.शेख हसीना यांनी बांगलादेशातून पलायन केल्यानंतर तेथे सत्तेवर आलेल्या अंतरिम सरकारने जमाते इस्लामी पक्षावरील बंदी उठवली होती.

तारिक रेहमान यांचा भूतकाळ पाहिला तर तो फारसा भुषणावह मानता येणार नाही.त्यांच्यावर बरेच भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. २००६ ०७ मध्ये बांगलादेशात लष्कर समर्थित अंतरिम सरकार सत्तेवर असताना, तारिक रेहमान यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात टाकण्यात आले होते.नंतर ते तुरुंगात आजारी पडल्याने,त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली होती. २००८ साली त्यांनी मेडिकल ट्रिटमेंट घेण्यासाठी इंग्लंडला प्रयाण केले होते.त्यानंतर १७ वर्षे ते इंग्लंडमध्येच वास्तव्य करत होते.इंग्लंडमध्ये बरेच दिवस वास्तव्य केल्याने, त्यांनी तेथील वेस्टमिन्स्टर लोकशाही संसदीय प्रणाली जवळून बघितली असेल.त्याचा फायदा त्यांना पंतप्रधान म्हणून प्रशासन चालवताना नक्कीच होईल.

तारिक रेहमान यांच्या समोर अनेक आव्हाने आहेत.बांगलादेशची अर्थव्यवस्था सध्या फार मोठ्या संकटात आहे.बांगलादेशला निर्यातीतून सर्वात जास्त उत्पन्न मिळवून देणाऱ्या गारमेंट व्यवसायाची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे.कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती मोठ्या प्रमाणात बिघडली आहे.महागाई आणि बेरोजगारीमुळे, सामान्य माणूस त्रस्त आहे.शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा यांचा बोजवारा उडाला आहे.अशा परिस्थितीत तारिक रेहमान हे या आव्हानांचा सामना कसा करतात ते पहावे लागेल.बऱ्याच वर्षांनंतर बांगलादेशमध्ये निवडणुका या मोकळ्या आणि भयमुक्त वातावरणात झाल्या आहेत.त्याबद्दल बांगलादेश मधील निवडणूक आयोग, अंतरिम सरकार, सुरक्षा यंत्रणा आणि मतदार यांचे अभिनंदन करणे गरजेचे आहे.विशेषत: निवडणुकीत प्रमुख विरोधी पक्ष म्हणून निवडून आलेल्या जमाते इस्लामी या पक्षाने निवडणुकीचे निकाल फारशी खळखळ न करता स्विकारले आहेत,ही फार मोठी उपलब्धी आहे.

**राहुल गांधी यांना सत्प्रवृत्त पण राजकीयदृष्ट्या अपरिपक्व, डावपेच खेळण्यात अननुभवी असे म्हटले जायचे. तथापि, यंदाच्या अधिवेशनात लोकसभेत विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची कामगिरी त्यांच्या आयुष्यातील सर्वात दर्जेदार कामगिरी झाली असे म्हणायला हरकत नाही. एकेकाळी राहुल गांधी म्हणजे 'टाइमपास' व भाजपच्या भाषेत म्हणायला गेले तर 'पप्पू' ही प्रतिमा तयार करण्यात सत्ताधाऱ्यांना यश आलं होतं. परंतु हा 'पप्पू' आपल्या अफाट कामगिरीने केव्हा 'पप्पा' झाला हे भाजपच्या नेत्यांना देखील समजले नाही. एवढेच नव्हे तर सर्वजण म्हणू लागले की 'पप्पू बन गया जंटलमन'. सत्ताधाऱ्यांच्या डोळ्याला डोळा भिडवत आव्हान देऊन मुठभर विरोधी पक्षाने पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांना अक्षरशः जेरीस आणले. शासनाच्या सर्व यंत्रणा जवळपास भारतीय जनता पक्षाला साथ देत असतानाही लोकसभेला 'अगली बार चारशे पार'चा नारा देत हा पक्ष २४० वरच येवून थांबला. सगळीकडे विक्रमी बहुमत मिळेल अशा भाषेत प्रचार केला, मित्र पक्षांची गोची केली, विरोधकांची जिरवायला अपक्ष उभे केले, एमआयएमला आतून मदत केली, ऐकलं तर समजून सांगून नाहीत डोक्याला बंदूक लावून, गचुंडी धरून, पैसा फेकून बिनविरोधचे प्रकारही केले, ईव्हीएम बंद पाडल्या, आकडे फिरवले, बटण फक्त कमळाचेच चालू ठेवले, निवडणूक जाहीर झाली तेव्हापासून पैसे वाटले तरी मतदारांनी मात्र पाहिजे तेवढे बहुमत दिले नाहीच. त्यातच लोकसभेत विरोधी पक्ष नेता नसल्यामुळे मोदी शहा निवांत होते. परंतु जवळपास शंभरीपर्यंत पोहोचलेल्या काँग्रेसमुळे लोकसभा आता दणाणू लागली. देशाच्या पंतप्रधानांनी महिलांच्या आक्रमक भूमिकेमुळे संसदेतून बाहेर निघून जाणे पसंत केले. याचाच अर्थ विरोधी पक्ष कमालीचा आक्रमक झाला असून त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना सत्ताधारी गलितगात्र झाल्यासारखे दिसू लागले आहेत. याला अनेक कारणे घडली आहेत. विरोधी पक्ष जवळपास संपुष्टात आल्यासारखेच वातावरण तयार झाले होते. त्यामुळे भाजपने लोकशाही आणि संविधानाने आम्ही कारभार चालवतो म्हणायचं आणि निवडणुकीत जातीय आणि धार्मिक ध्रुवीकरणावर जोर दिला जायचा. जगातला सगळ्यात मोठा पक्ष आपलाच आहे म्हणायचं आणि विरोधी पक्षातले कार्यकर्ते, आमदार, खासदार, मंत्री, माजी मुख्यमंत्री असे सगळे आपल्याकडं घ्यायचे, असे धोरण आखले गेले. ज्यांचे कधीकाळी कपडे फाडलेले होते, त्यांच्याच फाटक्या कपड्याला सुई धाग्याने टाके घालण्यात आले. याचाच परिणाम लोकसभेतील बहुमत घटण्यावर झाला. नितीशबाबू, चंद्राबाबू नायडूंनी साथ दिली म्हणून निदान सरकार तरी स्थापन करता आले. परंतु ज्या चंद्राबाबूंना तुरुंगात डांबण्याची भाषा करण्यात आली होती, त्यांना हात ओढून ओढून शेजारी बसण्याची विनंती देशाच्या पंतप्रधानांना करावी लागली.**

## खरचं 'पप्पू'चा 'पप्पा' झाला!



अठराव्या लोकसभेत विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधींनी केंद्र सरकारच्या धोरणांवर, विशेषतः सार्वभौमत्व, आर्थिक निर्णय आणि परराष्ट्र धोरणांवर तीव्र टीका केली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एपस्टीन फाईलवर आवाज उठवून 'मला काय सांगायचे आहे' हे भारतीयांना लोकसभेच्या माध्यमातून दाखवून दिले. त्या प्रश्नाला उत्तर देणे मोदी शहा यांच्यासह हरदीप सिंग यांनाही जड गेले. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर राहुल गांधी यांच्याकडे तयार होते. कोणतेही आव्हान स्वीकारण्याची तयारी त्यांची झाली होती. लोकसभेतच नव्हे तर लोकसभेच्या बाहेर पत्रकार ज्या ठिकाणी जमा झाले होते, तेथेही दोन केंद्रीय मंत्र्यांना 'एकत्र चर्चा करूया' असे सांगितले होते पण त्या दोन मंत्र्यांनी देखील काढता पाय घेतला. राहुल गांधीचे हे रूप पहिल्यांदाच देशवासीयांनी पाहिले. त्यांनी 'भारत जोडो यात्रा' आणि 'न्याय यात्रे'नंतर आक्रमक भूमिका घेत, वाढती भू-राजकीय अस्थिरता आणि जागतिक संकटांविषयी संसदेत महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. २०२४ च्या निवडणुकीत रायबरेलीतून विजय मिळवल्यानंतर ते लोकसभेत बारावे विरोधी पक्षनेते बनले आहेत. राहुल गांधींनी संसदेत सरकारवर टीकेची झोड उठवली आहे, ज्यामध्ये प्रामुख्याने देश, परराष्ट्र धोरण आणि डाटा सुरक्षिततेशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे मांडले. त्यांनी 'स्थिरतेचे जग अस्थिरतेकडे' जात असल्याचा इशारा दिला आणि वाढत्या भू-राजकीय तणावामुळे भारताच्या सुरक्षेवर होणाऱ्या परिणामांवर प्रकाश टाकला. सरकारला प्रमुख आश्वासनांची आठवण करून देत उत्तरदायित्वाची मागणी केली, ज्यामुळे संसदेत अनेकदा गदारोळ झाला. २०२४ च्या निवडणुकीत पक्षाची कामगिरी सुधारून ९९ जागा जिंकण्यात आणि दशकानंतर अधिकृत विरोधी पक्ष दर्जा मिळवून देण्यात त्यांनी मुख्य भूमिका बजावली. त्यांच्या अलीकडील भाषणांमुळे सत्ताधारी बाकांकडून कडक आक्षेप नोंदवले गेले, ज्याने संसदेत तीव्र राजकीय चर्चा घडवून आणली गेली. राहुल गांधी यांच्या बाबतीत अतिशय सकारात्मक वातावरण अचानक तयार झालेले नाही. भारत जोडो यात्रा आणि सरकारवर आक्रमक टीका हे त्यांचे गुण मानले गेले. दुसऱ्या बाजूला राजकीय अपरिपक्वता, सातत्याचा अभाव आणि चुकीची प्रतिमा हे अवगुण त्यांच्या राजकीय प्रवासात टीकाकारांकडून नोंदवले जातात. सध्या तर केंद्र सरकारवर थेट आणि जोरदार टीका ते करू लागले आहेत. 'भारत जोडो यात्रे'सारख्या उपक्रमांद्वारे लोकांशी संवाद साधून प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न झाला होता. पण निर्णय घेण्यातील संथपणा आणि राजकीय रणनीतीतील कच्चेपणा हे दुर्गुण ठरतात, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. राजकारणात सातत्याने सक्रीय न राहणे, अनेकदा अचानक सुट्टीवर जाणे, यामुळे विरोधी पक्षांकडून त्यांची चुकीची प्रतिमा तयार केली जाते आणि त्यामुळे जनमानसातील विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असतो. पण त्यांची माणूस म्हणून एक चांगली बाजू निर्भया खटल्यादरम्यान माहित पडली. निर्भयाच्या कुटुंबाची काळजी करून त्यांना कुठल्याही गोष्टींची कमी पडणार नाही आणि निर्भयाच्या भावाचा पायलटच्या ट्रेनिंग प्रशिक्षणाचा खर्च राहुल गांधी यांनी केला असं निर्भयाच्या आई आणि वडिलांनीच मागे सांगितलं. राजकीय मतभेद असतील लाख, पण राहुल गांधींची ही माणुसकीची बाजू मनाला स्पर्श करून गेली. विशेष म्हणजे लोकसभेत नव्हे तर बाहेरही त्यांची मोदींवर टीका सुरूच असते. नरेंद्र मोदी स्वतःला ओबीसी म्हणवतात, पण ते ओबीसी नाहीत, ते जनरल कोट्यातले होते, गुजरात सरकारने कायदा बदलला त्यानंतर ते ओबीसी झाले. पण महत्वाचा प्रश्न आहे की, नरेंद्र मोदींनी ओबीसी समाजासाठी काय केले? जीएसटीच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांची लूट सुरु आहे. भाजप सरकार मात्र तुम्हाला म्हणते, आधी रोटी खाओ, प्रभू के गुण गाओ, और भूके मर जावो' असा प्रहार करतांना ते यावेळी दिसले.




**जयंत महाजन**
94206 91420

### राहुल गांधींनी सरकारवर कठोर प्रहार केले

आजपर्यंत राहुल गांधी यांनी लोकसभेत जी कामगिरी केली, त्यापेक्षा उत्कृष्ट कामगिरी यंदाच्या अधिवेशनात केली. त्यात त्यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये अमेरिकेतीलजेफ्री एपस्टीनयाच्याशी संबंधित गोपनीय कागदपत्रे 'एपस्टीन फाइल्स' सार्वजनिक झाल्यानंतर भारताच्या राजकारणात मोठा गदारोळ झाला आहे. या प्रकरणावरून राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान या फायलींचा उल्लेख करून त्यांनी दावा केला की, या फायलींमध्ये काही महत्त्वाच्या भारतीय व्यक्तींची नावे आहेत. केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी आणि उद्योजकअनिल अंबानी यांची नावे या फायलींमध्ये आहेत. त्यांनी असाही प्रश्न उपस्थित केला की, नाव समोर येऊनही त्यांच्यावर कारवाई का होत नाही? या फायलींमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर 'थेट दबाव' आहे, ज्यामुळे भारताचे ऊर्जा सुरक्षा आणि संरक्षण क्षेत्रातील हितसंबंध धोक्यात आले आहेत. राहुल गांधींच्या आरोपांना 'मूर्खपणा' म्हटले, तर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने पंतप्रधान मोदींच्या संदर्भातील सर्व दावे 'कचरा' म्हणत फेटाळले आहेत. थोडक्यात, राहुल गांधी यांनी या प्रकरणाचा वापर करून मोदी सरकारवर भ्रष्टाचाराचे आणि विदेशी दबावाचे आरोप करून सरकारला जेरीस आणले, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही.

**महासागर**
**भंडारा**
सोमवार १६ फेब्रुवारी २०२६
पान ६

## वनपरीक्षेत्र कार्यालय लेंडेझरी कडून महाप्रसादाचे वितरण

**महासागर प्रतिनिधी**
**जांब (लोहारा ) दि.१५ फेब्रुवारी:** महशिवरात्रीनिमित्याने वनपरीक्षेत्र कार्यालय लेंडेझरी अंतर्गत सहवनक्षेत्र लेंडेझरीच्या आवारात वनकर्मचारी, संयुक्त वनव्यवस्थापन समिती व लेंडेझरी ग्राम वाशिय यांच्या संयुक्त विद्यमाने महाशिवरात्री निमित्त महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी निरंजन वैद्य संयुक्त वनव्यवस्थापन समिती अध्यक्ष ताराचंद टेकाम, क्षेत्र सहाय्यक लेंडेझरी व्हि जे येरपुडे



ए.एन.बेडके बिट रक्षक, ए एन पवार बिटरक्षक संजय गजाम, धर्मेंद्र कुंभरे, आशीक धुर्वे, रवि कुंभारे, विलास शीवरकर, शैलेश शिवरकर, महेंद्र कंगाली, चक्रधर शिरसाम व समस्त गावकरी यांचा सहभाग होता.

## अखिल भारतीय ग्राहक पंचायत भंडाऱ्याचा प्लास्टिक कचरा मुक्त अभियान

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१५ फेब्रुवारी:** महाशिवरात्रीचे औचित्य साधून अखिल भारतीय ग्राहक पंचायत भंडारा जिल्हा तर्फे बहिरंगेश्वर मंदिर भंडारा येथे पर्यावरण संरक्षण आयामा अंतर्गत 'प्लॅस्टिक कचरा मुक्त परिसर' अभियान राबविण्यात आले. ग्राहक पंचायतीचा कार्यकर्त्यांनी घरून येताना एक कापडी किंवा कागदी पिशवी सोबत आणली. परिसरातील प्लॅस्टिक कचरा त्यात संकलन केला. तसेच बहिरेश्वर मंदिर देवस्थान आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने सर्व भाविकांनी प्लास्टिक कचरा परिसरात न टाकता कचराकुंडीत किंवा कार्यकर्त्याच्या पिशवीत टाकावे आणि परिसर प्लास्टिक कचरा मुक्त करण्यास



सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.

सकाळी १०.०० ते १२.०० आणि सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळात कार्यकत्यांनी आपले योगदान दिले.

तसेच महाप्रसादासाठीही प्लॅस्टिक द्रोण किंवा ग्लास न वापरता कागदी द्रोण आणि ग्लास वापरावेत आणि भाविकांनी प्रसाद ग्रहण केल्यावर कचराकुंडीतच द्रोण- ग्लास टाकावा, असेही आवाहन करण्यात आले.

यावेळी बहिरेश्वर मंदिराचे सर्व कार्यकर्ते आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हा अध्यक्ष श्री. जयंत सब्जीवाले, जिल्हा उपाध्यक्ष श्री प्रकाश कुरोडे नगर अध्यक्ष श्री. रविंद्र तायडे, जिल्हा महिला प्रमुख सौ. दीप्ती कुरोडे, जिल्हा सचिव श्री. अनिल शेंडे, सहसचिव श्री. राजेश पांडे, जिल्हा सहसचिव सौ. जयश्री सातोकर, विदर्भ आयटी सेल प्रमुख श्री.चंद्रशेखर साठे, मार्गदर्शक श्री. विष्णूपंत पंडे, श्री. रमेश पारधी, श्री. सईद शेख, सौ. कल्पना पनके, सौ. मंजिरी पनवेलकर, सौ. छाया कावळे, सौ. करुणा चांदे, श्री व सौ. ढोके उपस्थित होते.

सदर अभियानात बहिरंगेश्वर देवस्थानचे सर्व पदाधिकारी, परिसरातील डॉक्टर, पोलिस व समस्त भक्त मंडळी यांनी सक्रिय सहभाग घेतला. विशेष म्हणजे पर्यावरण आयामाला महिला आयामाची उत्कृष्ट साथ मिळाली.

## संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून विविध पुरस्कार कार्य करणाऱ्या संस्था कडून रितसर अर्ज सुरु

**भंडारा :** सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार व क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार करीता इच्छुक असलेल्या व्यक्ती व त्या समाजाच्या उत्थानासाठी कार्य करणाऱ्या संस्था, यांच्याकडून रितसर अर्ज २०२५-२६ साठी मागविणे सुरु झालेले आहे

राज्यातील वीरशैव लिंगायत समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी सामाजिक, कलात्मक, समाज प्रबोधन व साहित्यिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कलावंत साहित्यिक, समाज प्रबोधनकार व समाज सेवक आणि यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त प्रतिवर्षी वैशाख शुध्द (अक्षय तृतीया) या दिवशी त्यांच्या नावाने एक व्यक्ती व एक संस्थेला महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार देवून सन्मानित केला जातो. नटराज पुरस्कार आणि पारंपारिक कारागिरांना 'विश्वकर्मा पुरस्कार' दिला जातो. विमुक्त जाती व भटक्या जमातीकरीता सामाजिक, कलात्मक प्रबोधन इत्यादी क्षेत्रात काम करीत असलेल्या पारंपारिक लोककलाकार/लोककलावंत व पारंपारिक कारागिर यांना सदर योजना लागू आहे. ब्रिटिशाविरोधात लढणारे क्रांतीवीर राजे उमान नाईक हे विमुक्त जाती व भटक्या जमातीपैकी एक असलेल्या म्हणजेच रामोशी समाजातील होते. यास्तव त्यांच नावाने राज्यातील भटके व विमुक्त समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी कट समाजप्रबोधन व साहित्यिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या साहित्यिक, समाज प्रबोधनकार व समाजसेवक अशा व्यक्तिंन यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना 'क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार' लागु असेल. उपरोक्त प्रमाणे अधिक माहितीकरीता सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन डॉ. सचिन मडावी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण भंडारा यांनी केले आहे.

## हत्तीरोग दूरकरणीसाठी आरोग्य यंत्रणा सज्ज

### मान्यवरांच्या हस्ते अभियानास सुरुवात

**महासागर प्रतिनिधी**
**मोहाडी दि.१५ फेब्रुवारी:** हत्तीरोग (फायलेरियासिस) या डासांमुळे पसरणाऱ्या गंभीर आजाराच्या समूळ उच्चाटनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय हत्तीरोग दूरकरणी अभियानाची सुरुवात मोहाडी व तुमसर तालुक्यात करण्यात आली आहे. या अभियानाचा शुभारंभ उदघाटक आमदार राजू कारेमोरे यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष सागर गभने हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद सोमकुवर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संदीप कुमार गजभिये तसेच तुमसर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मेहबूब कुरेशी यांची उपस्थिती होती.



हे अभियान १० फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून, त्यासाठी तालुक्यातील संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना प्रतिबंधक औषधांचे सामूहिक सेवन करून देण्यात येणार आहे. हत्तीरोग हा आजार डासांमुळे होतो आणि वेळेत प्रतिबंध न झाल्यास हात, पाय तसेच इतर अवयवांवर कायमस्वरूपी सूज येऊन रुग्णाला आयुष्यभर अपंगत्वाचा सामना करावा लागतो.

या अभियानांतर्गत डि-ईसी व अल्बेन्डाझोल ही प्रतिबंधक औषधे आरोग्य विभागामार्फत दिली जाणार आहेत. आरोग्य सेवक , आशा स्वयंसेविका व इतर आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन नागरिकांना औषध सेवन करून देणार आहेत. दोन वर्षांखालील बालके, गरोदर महिला व गंभीर आजारी व्यक्ती वगळता सर्व नागरिकांनी ही औषधे घेणे आवश्यक असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले. उद्घाटनप्रसंगी आ. राजू कारेमोरे यांनी हत्तीरोगमुक्त तालुका करण्यासाठी नागरिकांनी आरोग्य विभागाच्या या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलिंद सोमकुवर व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संदीपकुमार गजभिये यांनी औषध सेवनाबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी निर्धास्तपणे औषधे घ्यावीत, असे आवाहन केले. औषध घेतल्यानंतर किरकोळ दुष्परिणाम जाणवल्यास त्वरित नजीकच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षा अर्थसहाय्य योजनेतून तरुणांना रोजगाराची नवी दिशा

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि.१५ फेब्रुवारी:** शासनाच्या अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनापैकी एक 'शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षा अर्थसहाय्य योजना' ही योजना महाराष्ट्र राज्यस्तरावर राबविण्यात आली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षा घेण्यात आली होती. ह्या परीक्षेची फी अमृत संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षा अर्थसहाय्य योजनेंतर्गत जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

या योजनेत पात्र लाभार्थ्यांना परीक्षा शुल्क, प्रशिक्षण खर्च उपलब्ध झाले असून त्याचा थेट लाभ त्यांच्या करिअर प्रगतीस झाला आहे.

**अशी आहे योजना:-**

जे उमेदवार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची शासकीय संगणक टंकलेखन (typing) बेसिक कोर्स प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) (कम्प्युटर टायपिंग मराठी, हिंदी, इंग्रजी ३०, ४०, ५० व ६० शब्द प्रति मिनिट) उत्तीर्ण होतील, त्यांना एक रक्कमी रक्कम ६५००/- फक्त प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

जे उमेदवार महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची ऑनलाईन लघुलेखन (मराठी व हिंदी ६०,८०,१०० व १२० शब्द प्रति मिनिट तसेच, इंग्रजी लघुलेखन ६०,८०,१००,१२०,१३०,१४०,१५० व १६० शब्द प्रति मिनिट) परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांना एक रक्कमी रक्कम रुपये ५३००/- फक्त प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील या जातींचे उमेदवार घेऊ शकतील लाभ



१) ब्राह्मण , २) बनिया, ३) सिंधी ,४) मारवाडी ,५) गुजराती ,६) पटेल ,७) पाटीदार ८) आर्य वैश्य / कोमटी ,९) राजपूत, १०) राजपुरोहित, ११) बंगाली, १२) कायस्थ, १३) नायडू , १४) नायर, १५) ठाकूर, १६) त्यागी, १७) जाट, १८) ऐयांगर, १९) सेनगुंथर, २०) बेलमार, २१) कानबी, २२) कम्मा, २३) भूमिहार , २४) हिंदू नेपाली.

अमृत संस्थेच्या या योजनेमुळे समाजातील खुल्या प्रवर्गातील घटकांपर्यंत शिक्षण व रोजगाराच्या संधी पोहोचत असून इतर गरजू विद्यार्थ्यांनीही या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संबंधित संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक मार्फत करण्यात आले आहे.

तसेच अधिक माहितीकरीता ओमकार हरदास, जिल्हा व्यवस्थापक- अमृत, भंडारा (८८५७९३४७३२), हेमंत चंदवासकर, जिल्हा उप व्यवस्थापक–अमृत, भंडारा (९३२५१७३४४५), यांना संपर्क करावा ,असे आवाहन करण्यात येत आहे.

## १८ फेब्रुवारीपासून भव्य शंकरपट स्पर्धा

### पहिले बक्षीस ७५,०००, पराभूत जोड्यांना देखील बक्षीस



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि.१५ फेब्रुवारी:** शंकरपट समिती १८, १९ आणि २० फेब्रुवारी रोजी हिरक महोत्सवाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त एकोडी रोडवरील स्थानिक पट मैदानात भव्य शंकरपट स्पर्धा आयोजित करत आहे. हा ऐतिहासिक प्रसंग विशेष आणि भव्य करण्यासाठी व्यापक तयारी सुरू आहे. समितीच्या म्हणण्यानुसार, यावर्षीचे पहिले पारितोषिक ७५,००० रुपये आमदार नाना पटोले आणि पट समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दिले जाईल. दुसरे पारितोषिक ६१,००० रुपये असेल, ज्यामध्ये ५१,००० रुपये बीडीडीसीसी बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे यांनी दिले आहेत आणि १०,००० रुपये पट समितीने दिवंगत प्रभाकर सपाटे यांच्या स्मृति प्रीत्यर्थ दान केले आहेत. याशिवाय, तृतीय पारितोषिक: ५१,००० रुपये (चंद प्रकाश साखरवाडे), चौथे पारितोषिक: ४१,००० रुपये (प्रणित नशिने, रोहिणी मुंगुलमारे आणि मंदार खेडीकर), पाचवे पारितोषिक: ३१,००० रुपये २१,००० (शहर नगरसेवक संदीप बावनकुळे आणि नगर नगरसेवक मीना लांजेवार), ७ वे पारितोषिक: १५,००० रुपये (रवी राऊत आणि हेमकृष्ण वाडीभस्मे). समितीने स्पष्ट केले की केवळ स्पर्धेतील विजेतेच नव्हे तर पराभूत झालेल्यांनाही, सहभागी होणाऱ्या पाच जोडप्यांना अनुक्रमे १५,०००, ११,०००, ९,०००, ७,००० आणि ५,००० रुपये प्रोत्साहनपर रक्कम देखील दिली जाईल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीचे सदस्य सपन कापगटे, सुरेश बघेल, ओंकार कापगटे, हेमंत भारद्वाज आणि दिलीप झोडे काम करत आहेत. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नागरिकांनी आणि शंकरपटप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### नेटवर्कच्या कार्यात हस्तक्षेप निर्माण करत नुकसान

**भंडारा :** पो स्टे भंडारा आहे की, यातील दि. ९/२/२०२६ रोजी आय टि.आय. टाकळी जि. भंडारा येथे यातील आरोपी १-मनोज राजेन्द्र पाटिल वय ३० वर्षे रा. आय. टीय व्ही आय ब्रँन्च मागे न्यु सी नगर खोकरला भंडारा २-रोकेश धांडे वय- ३२ वर्षे रा. जुना हनुमान मंदिर वार्ड नं. ०१ सावरी लाखनी जी. भंडारा हे कंपनीमध्ये दोघे टेक्निशियन म्हणून काम आहे. मागील काही दिवसापासुन सदर दोन्ही व्यक्ती पगारवाढबद्दलच्या मागणीमुळे संपावर आहे. कंपनी कडुन त्याचा मागण्या पुर्ण होत नसल्याने ते नेटवर्कच्या कार्यात हस्तक्षेप निर्माण करत आहे. दि. ९/२/२०२६ ला दोन्ही आरोपीतांनी नमुद घटना ठिकाणी रिलायन्स जिओ कंपनीचे मोबाईल टावरवरील ( टावर क्रं - ००१०) फायबर केबल कापल्याने ५४ टावरची नेटवर्क सेवा २५८ तासासाठी खडीत झाली. ज्यामुळे कंपनीचे ३,००,०००/-रु. नुकसान झाले आहे. पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४(५),३(५)भा. न्या. सं.२०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

### रमेश बारस्कर यांचे निधन



**सानगडी :** सासरा येथील रमेश रतीराम बारस्कर यांचे वयाच्या ५० व्या वर्षी दिनांक १४/ २/ २०२६ रोज शनिवारला साय. ५ वाजता अचानक दुःखद निधन झाले. त्याच्या पश्चात आई,भाऊ,पत्नी आणि दोन मुले असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

## महाशिवरात्रीचा शिवमंदिरात दर्शनासाठी अलोट गर्दी

**महासागर प्रतिनिधी**
**तुमसर दि.१५ फेब्रुवारी:** 'बम बम भोले, ओम नमः शिवाय, हर हर महादेव' असा अखंड जयघोष करत महाशिवरात्री निमित्त तुमसर शहरातील तिलक नगर येथील शिवमंदिरात भाविकांची गर्दी बघायला मिळाली.

महाशिवरात्रीनिमित्त मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांच्या सजावटीने सजवण्यात आले आहे.

मंदिरात दिवसभर सुंदरकांड व विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले.

या पवित्र प्रसंगी मंदिर परिसरात विविध सामाजिक



संस्थेच्या माध्यमातून महाप्रसाद वाटप करण्यात आली असून यामध्ये साबुदाणा खिचडी भाविकांना देण्यात आली.


### महाराष्ट्र शासन
### मृद व जलसंधारण विभाग, शासकीय वसाहत, सिव्हील लाईन्स, शासकीय निवासस्थान क्रंमाक बी-१२ जि. भंडारा-४४१९०४
### ईमेल - dwcobhandara@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र ब-१/०५/सन २०२५-२०२६**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, भंडारा हे खालील नमुद कामाकरीता रकाना क्र.७ मध्ये नमूद योग्य वर्गवारातील पात्र कंत्राटदारांकडुन ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, भंडारा यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत | इसारा/ बयाना रक्कम | निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याच्या कालावधी | कंत्राटदाराचा नोंदणीचा किमान वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **फक्त भंडारा जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता करिता राखीव** | | | | | | |
| १ | जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत गेटेड साठवण बंधारा, मौजा-सितेपार ता. मोहाडी जि. भंडारा चे बांधकाम करणे. | रु. ३०.८० लक्ष | रु.३१०००/- | रु.२०००/- + १८ %जीएसटी = रु.२३६०/- | ६ महिने | भंडारा जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता करिता राखीव |

**अ)** ई-निविदा उपलब्ध कालावधीः-**दिनांकः - १७/०२/२०२६ वेळ १८.३० ते दिनांकः २५/०२/२०२६ वेळ १७.३०** वाजे
**आ)** ई-निविदा उघडणे **दिनांकः २६/०२/२०२६ वेळ १७.४५** वाजे. **(शक्य असल्यास)**
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरिल वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
**१)** सविस्तर निवीदा सुचना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, भंडारा यांचे कार्यालयातील सुचना फलकावर उपलब्ध आहे.
**२)** संकेतस्थळावर प्रसिध्द होणाऱ्या वेळापत्रकानुसार निविदा उघडण्याची तारीख व वेळेप्रमाणे कंत्राटदाराने किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहावे, अन्यथा निविदा उघडल्यास कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही
**३)** वरिल कामाचे दोष दायित्व कालावधी दोन वर्षाकरिता आहे.

**जिमाका/ भंडारा/ जाहिरात / २०२६/१६८**

**जा.क्र./१९१५/नि.लि./नि.सु.क्र./०५/२०२६ दिनांक. ०९/०२/२०२६**

**(महेश सु.सेलुकर)**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
**मृद व जलसंधारण विभाग, भंडारा.**


RNI NO.- MAHMAR 2010/36801
Mahasagar Bhandara
आर.एन.आय. नोंदणी क्र. [illegible]
महासागर भंडारा

# कॅलिडोस्कोप

# मृतदेहाजवळ कुत्रा बसून राहिला!



हिमाचल प्रदेशातील बर्फाच्छादित पर्वतातून एक हृदय हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. चार दिवस प्रचंड थंडी, बर्फवृष्टी आणि जंगली प्राण्यांचा धोका असूनही एक पाळीव कुत्रा आपल्या मालकाच्या मृतदे–हाजवळून हलला नाही. या काळात त्याने ना काही खाल्लं ना पाणी प्यायला ना आसरा शोधला. 'रेस्क्यू पथक' घटनास्थळी पोहोचल्यावर हा प्रसंग पाहून अनेकांचे डोळे पाणावले. घटना हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील भरमौर परिसरातील आहे.

विकसित राणा (वय १९) आणि त्याचा मावसभाऊ पीयूष (वय १३) हे दोघे प्रसिद्ध भरमाणी माता मंदिरात दर्शनासाठी गेले होते. त्यांच्यासोबत पीयूषचा पाळीव पिटबुल कुत्राही होता. दर्शनानंतर मंदिराच्या वरच्या भागात व्हिडीओ शूट करण्यासाठी गेले असताना अचानक जोरदार हिमवृष्टी सुरू झाली आणि दोघेही वाट चुकले. त्या दिवशी परिसरात सुमारे पाच फूट बर्फ साचला होता. संध्याकाळपर्यंत दोघांनी घरी फोन करून आपण सुरक्षित असल्याचे सांगितले होते; मात्र त्यानंतर संपर्क तुटला. पुढील चार दिवस ते बेपत्ता होते. अखेर 'रेस्क्यू टीम' घटनास्थळी पोहोचली.

डोंगर उतारावर एका झाडाजवळ पीयूषचा मृतदेह आढळून आला. त्याच्या जवळच त्याचा कुत्रा बसलेला होता अत्यंत अशक्त अवस्थेत, गळ्याला किरकोळ जखम झालेली; पण तरीही मालकाला सोडायला तयार नव्हता. 'रेस्क्यू टीम'च्या सुरक्षिततेसाठी कुत्र्याला सौम्य भूल देऊन मृतदेह बाहेर काढण्यात आला. काही अंतरावर एका नाल्यात विकसित राणाचा मृतदेहही सापडला. कुत्र्याला आणि पीयूषचा मृतदेह हेलिकॉप्टरद्वारे भरमौर हेलिपॅडवर आणण्यात आला आणि नंतर कुयिला कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले. या कठीण शोधमोहिमेत स्थानिक प्रशासन, पोलिस, वायुदल, पर्वतारोहक पथके आणि ग्रामस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# रेल्वेला शिकवला धडा

भारतात ट्रेनच्या विलंबामुळे सर्वांनाच त्रास होतो; पण या विलंबाला कंटाळून एका विद्यार्थिनीने रेल्वेला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला. तिने न्यायालयात खटला दाखल केला आणि मोठ्या दंडाची मागणी केली. शेवटी तिचा विजय झाला.

ही घटना उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यात घडली. तिथे एका विद्यार्थिनीची ट्रेनच्या विलंबामुळे 'नीट'ची परीक्षा चुकली. तिचे संपूर्ण वर्ष वाया गेले. पीडित विद्यार्थिनीने तिच्या वकिलामार्फत रेल्वेला धडा शिकवण्यासाठी दंडाची मागणी केली. वर्षभर चाललेल्या खटल्यानंतर, ग्राहक मंचाने विद्यार्थिनीचे आरोप खरे असल्याचे आढळले आणि रेल्वेला मोठा दंड ठोठावला. कोतवाली पोलिस ठाणे परिसरातील पिकोरा बक्ष परिसरातील रहिवासी समृद्धी ही 'नीट' परीक्षेची तयारी करत होती. तिचे परीक्षा केंद्र लखनऊमधील जयनारायण पीजी कॉलेजला देण्यात आले होते. परीक्षा देण्यासाठी, विद्यार्थिनीने बस्तीहून इंटरसिटी सुपरफास्ट ट्रेनचे तिकीट बुक केले. ट्रेन सकाळी ११ वाजता लखनऊला पोहोचणार होती; परंतु विलंबामुळे ट्रेन नियोजित वेळेपेक्षा अडीच तास उशिरा पोहोचली. विद्यार्थिनी दुपारी १२:३० वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचणार होती. त्यामुळे तिची परीक्षा चुकली.

यामुळे अस्वस्थ झालेल्या विद्यार्थिनीने ग्राहक आयोगाकडे प्रकरण नेले आणि रेल्वेला त्याचे परिणाम भोगावे लागले. जिल्हा ग्राहक आयोगाचे अध्यक्ष, न्यायाधीश अमरजीत वर्मा आणि सदस्य अजय प्रकाश सिंह यांनी रेल्वेला दंड ठोठावला आणि विद्यार्थिनीला नऊ लाख दहा हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले. न्यायालयाने असेही म्हटले आहे, की रेल्वेने भरपाई देण्यास उशीर केला तर त्यांना १२ टक्के रक्कम व्याज म्हणून द्यावी लागेल. समृद्धीचे वकील प्रभाकर मिश्रा यांनी स्पष्ट केले, की ती ७ मे २०१८ रोजी नीट परीक्षा देण्यासाठी लखनऊला



गेली होती. तथापि, ट्रेनच्या उशिरामुळे समृद्धीला परीक्षेपासून वंचित राहावे लागले आणि तिचे संपूर्ण वर्ष वाया गेले. त्यांनी जिल्हा ग्राहक आयोगाकडे खटला दाखल केला. रेल्वे मंत्रालय, रेल्वे महाव्यवस्थापक आणि स्टेशन अधीक्षकांना नोटीस पाठवण्यात आल्या; परंतु कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, ११ सप्टेंबर २०१८ रोजी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला.

हा खटला सात वर्षांहून अधिक काळ चालला. आयोगाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले आणि रेल्वेने ट्रेनच्या विलंबाची कबुली दिली, परंतु विलंबाचे कारण स्पष्ट केले नाही. न्यायालयाने दंड ठोठावला आणि रेल्वेला ४५ दिवसांच्या आत नऊ लाख दहा हजार रुपये भरण्याचे निर्देश दिले.

# हिमालयापेक्षाही जुनी नदी!

भारताची संस्कृती आणि इतिहासात डोकावलं असता अनेकदा काही भारावणारे संदर्भ डोळ्यांसमोर येतात आणि थक्क करून जातात. असेच संदर्भ देशातील नद्यांबाबतही आढळतात. नद्यांच्या उगमाच्या कथा अनेकदा विचार करायला भाग पाडतात, तर काही प्रसंग आख्यायिकांच्या रंजकतेच्या बळावर खिळवून ठेवतात.

ही आहे, भारतातील सर्वात प्राचीन नर्मदा नदी. माघ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या सप्तमीला या नदीचा उगम झाल्याचं म्हटलं जात असून, यंदा हा दिवस २५ जानेवारी रोजी आल्याने या नदीच्या जयंतीचा उत्सव साजरा झाला. मध्य प्रदेशातील अमरकंटक या ठिकाणी उगम पावणारी ही नदी मूळ उगमापासून १३ हजार किलोमीटर दूरपर्यंत वाहत जात तिचा प्रवाह पुढं खंबातच्या खाडीद्वारे सागराशी एकरूप होतो. हिंदूंसाठी नर्मदा ७ पवित्र नद्यांपैकी एक असून, ही भारतातील प्राचीन नदी आहे. इतकंच नव्हे, तर असंही म्हटलं जातं, की नर्मदा ही गंगा नदीपेक्षा ५ पटींनी जुनी आहे.

पुराणांपासून अगदी विज्ञानानंही नर्मदा नदीच्या आयुमानावर शिक्कामोर्तब केलं आहे. या नदीच्या उगमाबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. या नदीचा उगम भगवान शंकराच्या घामातून झाल्याचं म्हटलं जातं. आणखी एका कथेनुसार भगवान शंकरानं नर्मदा नदीतील प्रत्येक खडकाला शंकराच्या रुपात पुजण्याचं वरदान दिल्यानं या नदीतील प्रत्येक दगड हा शिवलिंगाप्रमाणं पूजनीय ठरतो अशी धारणा आहे. धर्म–शास्त्रांनुसार या नदी ही २५ कोटी वर्षे जुनी असून, हिमालय पर्वत आणि गंगा नदी ३ ते ५ कोटी वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं.




नर्मदा नदीला २५ कोटी वर्षे झाल्याचं सांगण्यामागे आणखी एक तर्क असून, त्यामागचं कारण सांगण्यात येतं, की नर्मदा नदीच्या पाण्यावर मगरींचं राज्य आहे. याच मगरींचं अस्तित्वं पृथ्वीवर २५ कोटी वर्षांपासून आहे. गोड्या पाण्यातील या मगरी जगातील इतर मगरींपेक्षा वेगळ्या असल्याचंही सांगण्यात येतं. काही वैज्ञानिक संदर्भांचा आधार घ्यायचा झाल्यास, नर्मदा नदीच्या खोऱ्याला जगातील काही प्राचीन नदी खोऱ्यांच्या श्रेणीत गणलं जातं. नर्मदा नदीमध्ये डायनासोरची अंडीसुद्धा सापडली असून, त्याशिवाय अनेक जीवांचे अवशेष आणि सापळे इथं सापडल्यानं ही नदी कोट्यवधी वर्षांपासून अस्तित्वात असल्याचं सांगण्यात येतं. या नदीचं आणखी एक महत्त्वं म्हणजे देशातील बहुतांश मुख्य नद्या पश्चिमेपासून पूर्वेला बंगालच्या उपसागराच्या दिशेनं वाहतात; मात्र नर्मदेचा प्रवाह उलट असून, ती पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत वाहते.

# दोन महिने दिवसच!

दिवसानंतर रात्र येते आणि सूर्य मावळला की अंधार पसरतो; मात्र जगात एक असा देश आहे जिथे तब्बल दोन महिने सूर्य मावळतच नाही. ना पूर्ण रात्र होते, ना घनदाट अंधार. मध्यरात्रीही आकाशात सूर्य दिसत राहतो आणि आजूबाजूला मंद उजेड पसरलेला असतो. 'सोशल मीडिया'वर सध्या या अनोख्या देशाची मोठी चर्चा सुरू असून लोक याला निसर्गाचा अद्भुत चमत्कार म्हणत आहेत.

हा अनोखा देश म्हणजे नॉर्वे. नॉर्वेला जगभरात 'मिडनाइट सन' म्हणजेच अर्ध्या रात्रीच्या सूर्यासाठी ओळखले जाते. दरवर्षी काही महिन्यांसाठी नॉर्वेमध्ये जणू वेळच थांबल्यासारखा भास होतो. येथे संध्याकाळ होते; पण पूर्ण अंधार कधीच होत नाही. नॉर्वे आर्क्टिक सर्कलच्या अत्यंत जवळ असणारा देश आहे. त्याची भौगोलिक रचना आणि पृथ्वीवरील स्थान यामुळेच तिथे ही अद्भुत नैसर्गिक घटना घडते. दरवर्षी मे ते जुलै या कालावधीत सुमारे ७६ दिवसांपर्यंत नॉर्वेमध्ये सूर्य अस्ताला जात नाही.

सूर्य क्षितिजाजवळ फिरत राहतो; मात्र पूर्णपणे खाली मावळत नाही. त्यामुळे मध्यरात्रीही आकाशात उजेड कायम राहतो.



या काळात पृथ्वीचे फिरणे अंधाराला नॉर्वे जवळील काही भागांपर्यंत घेऊन येते; मात्र नॉर्वे देशाला संपूर्णपणे अंधारात लपेटू शकत नाही. अंधार जणू या देशाला स्पर्श करून पुढे निघून जातो.

दरम्यान, येथे फक्त हलकीशी संध्याकाळ अनुभवायला मिळते पण पूर्ण रात्र कधीच होत नाही. सोशल मीडियावर नॉर्वेच्या मिडनाइट सनचे फोटो आणि व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असतात. हे दृश्य पाहून लोक आश्चर्यचकित होतात.

# एकमेव करमुक्त राज्य!

भारतात व्यवसाय करणारे टॅक्स सिस्टीममुळे वैतागले आहेत. फक्त व्यावसायिकच नाही, तर भारतात गरीब श्रीमंत प्रत्येकालाच कर भरावा लागतो. भारतात कर भरणे भरणे प्रत्येकाला कायद्याने बंधनकारक आहे; मात्र देशातीलच एक राज्य पूर्णपणे टॅक्स फ्री आहे. इथे करोडो रुपये कमावले, तरी देखील एक रुपयाचाही कर भरावा लागत नाही.

सिक्कीम हे भारतातील एकमेव 'टॅक्स फ्री' राज्य आहे. सिक्कीला भारतीय प्रजासत्ताकात विशेष दर्जा प्राप्त जाला आहे. यामुळे येथील नागरिकांना करातून १०० टक्के सूट मिळते. इथे लोक कितीही कमावत असले, तरी त्यांना प्राप्तिकर भरावा लागत नाही. भारतीय संविधानाच्या कलम ३७१(एफ) आणि प्राप्तिकर कायदा १९६१ च्या कलम १०(२६एए) अंतर्गत सिक्कीम राज्यात ही सुविधा लागू करण्यात आली आहे. १९७५ मध्ये सिक्कीमला हा करमुक्त विशेष दर्जा मिळाला. त्या वेळी सिक्कीम हे राज्य भारतीय संघराज्यात सामील झाले नव्हते. सिक्कीमची आर्थिक स्थिती मजबूत करणे आणि तेथील नागरिकांना आर्थिक स्वातंत्र्य प्रदान करणे हा या विशेष अधिकाराचा उद्देश होता. सिक्कीममधील नागरिकांना मिळणारी ही कर सवलत फक्त प्राप्तिकरातून तसेच वैयक्तिक उत्पन्नापुरती मर्यादित नाही, तर ही रोख्यांवर मिळणारे व्याज आणि लाभांशावरही लागू होते. सिक्कीम करमुक्त ठेवण्याचा निर्णय राज्याच्या आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरला आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे, तर पर्यटन हादेखील राज्यातील प्रमुख व्यवसाय आहे. सर्व व्यवहार करमुक्त होत असल्याने नागिकांना कमाईची मोठी संधी मिळते. त्यामुळे त्यांची बचत होऊन त्यांना अधिक गुंतवणुक करता येते. या धोरणामुळे राज्याची आर्थिक स्थिती मजबूत झाली आहे. सिक्कीमचे हे करमुक्त मॉडेल देशभरात चर्चेचा विषय बनले आहे. इतर राज्यांनीही अशी धोरणे स्वीकारल्यास भारताची एकूण आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होऊ शकते.



# मेटिंगशिवाय गर्भधारणा

गर्भधारणेसाठी शुक्राणू आणि स्त्रीबीज या दोहोंची गरज असते. मादी मेटिंगशिवाय गर्भार राहू शकत नाही. आयव्हीएफ तंत्रज्ञानातही शुक्राणू आणि स्त्रीबीजाचं कृत्रिम पद्धतीने मीलन घडवून आणलं जातं. पण एका विशिष्ट प्रजातीच्या सापाची मादी मेटिंगशिवाय गरोदर राहू शकते. शास्त्रज्ञांनी उत्तर अमेरिकेतल्या पीट वायपर आणि कनेक्टिकटमध्ये आढळणाऱ्या कॉपरहेड सापांचा बारकाईने अभ्यास करून काही निष्कर्ष काढले आहेत. यानिमित्ताने 'बोआ कॉँस्ट्रिक्टर' प्रजातीच्या सापाच्या मादीतली अलैंगिक प्रजननाची क्षमता जगापुढे आली आहे. नॉर्थ कॅरोलिना स्टेट विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. या सापाच्या बऱ्याच मादी पिलांच्या जन्मात नर सापाचं कोणतंही योगदान नसल्याची बाब त्यांनी हेरली. अलैंगिक प्रजननाला शास्त्रीय भाषेत 'फॅकल्टेटिव्ह पार्थेनोजेनेसिस' असं म्हणतात. या तंत्रज्ञानात मादीच्या गर्भाशयात शुक्राणूंशिवाय अंडी किंवा गर्भ राहतो. सापांच्या या प्रजातीत आढळणारा हा गुणधर्म निसर्गाचा चमत्कारच म्हटला पाहिजे. ही अत्यंत दुर्मीळ बाब असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. नर सर्पांमध्ये दोन झेड क्रोमोसोम्स असतात तर मादी सर्पात एक झेड आणि एक डब्ल्यू झेड क्रोमोसोम आढळतो. असं असताना अलैंगिक प्रजननाद्वारे जन्मलेल्या मादी सापांमध्ये डब्ल्यू डब्ल्यू क्रोमोसोम आढळले आहेत. या पद्धतीने जन्मलेला मादी सापांचा रंग आईसारखा असतो. त्यांचे लैंगिक क्रोमोसोम्सही नैसर्गिक प्रजननाद्वारे जन्मलेल्या सापांपेक्षा भिन्न असतात. 'बोआ कॉँस्ट्रिक्टर' ही प्रजाती मध्य आणि दक्षिण अमेरिकेत आढळते. इतर सापांच्या तुलनेत त्यांची पचनशक्ती बरीच जास्त असते. या सर्पाची मादी एका वेळी ६० पिलांना जन्म देऊ शकते.



# रणकपूरचं अनोखं जैन मंदिर

भारतात हजारो मंदिरं आहेत. त्यांच्याशी संबंधित अनेक पौराणिक कथा तसंच त्यांची अनेक वैशिष्ट्यंही आहेत. स्थापत्यकला, नक्षीकाम, रचनेमुळे लोकप्रिय ठरलेली मंदिरं पाहण्यासाठी देशी–विदेशी पर्यटकांची गर्दी होत असते. असंच एक संगमरवरी मंदिर राजस्थानातल्या उदयपूरमध्ये वसलंय. जैन धर्मीयांचं श्रद्धास्थान असणारं हे मंदिर १५०० खांबांवर उभं असून उदयपूरपासून १०० किलोमीटरवर असणाऱ्या रणकपूरचं हे एक खास वैशिष्ट्य मानलं जातं. जैनांच्या पाच प्रमुख स्थानांमध्ये याचा समावेश असून इथलं सौंदर्य नजरेत भरण्यासारखं आहे. मंदिराच्या खांबांवर सुंदर नक्षीकाम करण्यात आलं आहे. संगमरवरातून साकारलेल्या या मंदिराच्या दारांच्या रचनेत कलात्मकता ठासून भरली आहे. गाभाऱ्यात तीर्थंकर आदिनाथाच्या संगमरवरात घडवलेल्या चार भव्य मूर्ती आहेत. पंधराव्या शतकात राणा कुंभाच्या राजवटीदरम्यान मंदिर बांधण्यात आलं. मंदिरात बरीच तळघरं आहेत. संकटकाळी मूर्ती लपवता याव्या या हेतूने इथल्या तळघरात त्या लपवण्याची सोय केलेली दिसते. असं हे मंदिर आश्चर्यच म्हटलं पाहिजे.



# वर्ण उजळवणारी आग

सुंदर दिसण्यासाठी वेगवेगळे फंडे अनुसरले जातात. या तंत्रज्ञानाच्या युगात सौंदर्य जपण्यासाठी वेगवेगळी तंत्र अवलंबली जातात. शस्त्रक्रिया करून बसकं नाक सरळ केलं जातं. चेहऱ्यावर पडू पाहणाऱ्या सुरकुत्या थोपवण्यासाठी नानाविध थेरपींचा अवलंब होतो. आधुनिक तंत्र आणि उपचारामुळे सावळ्या मुलीही गोऱ्या दिसू लागतात. थोडक्यात काय, आता सौंदर्यक्षेत्रात अशक्य असं काहीही राहिलेलं नाही. फॅशनच्या जगात कधी कुठला ट्रेंड येईल सांगता येत नाही. व्हिएतनाममध्ये 'फायर ट्रिटमेंट' किंवा 'फायर थेरपी'द्वारे सौंदर्य खुलवण्याचा भन्नाट प्रयोग सुरू आहे. आपण आगीपासून चार हात लांबच राहतो. पण हीच आग वर्ण उजळवू शकते यावर आपल्याला विश्वास ठेवावा लागेल. सध्या व्हिएतनाममधल्या पुरुष आणि महिलांना सुंदर दिसण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटलं आहे. इथली सलून्स आणि स्पा फायर थेरपीद्वारे त्यांना सुंदर बनवण्यास सज्ज आहेत. या उपचारात अंगावर टॉवेल टाकून त्याला आग लावण्यात येते. ३० सेकंद ते एक मिनिटापर्यंत हा प्रकार सुरू राहतो. या प्रकारामुळे सौंदर्यवृद्धी होतेच शिवाय निद्रानाश, डोकेदुखी, अंगदुखी यासारख्या समस्याही दूर होत असल्याचा दावा आहे.

या थेरपीदरम्यान योग्य ती काळजी घेतली जाते असं तज्ज्ञ सांगतात. फायर थेरपीमुळे सुरकुत्यांचं प्रमाण कमी होत असल्याचं सांगितलं जातं. चीनमध्येही या तंत्राची चलती आहे. तिथे याला 'फ्लेम फेशियल' असं म्हणतात. ही थेरपी देताना अंगावर टाकल्या जाणाऱ्या टॉवेलवर अल्कोहोल शिंपडतात. प्रशिक्षित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व प्रक्रिया होत असल्यामुळे काळजीचं कारण नसल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे कधी व्हिएतनामला भेट दिली तर फायर थेरपी तुमच्या बकेट लिस्टमध्ये असू द्या.



# विविध घटनेत चौघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. १५ :

तलावावर बैल धुण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा एका बैलासह तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवार १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता सुमारास गोंदिया तालुक्यातील खातिया येथे घडली. महेंद्र बाबुराव कवरे (वय ४७) रा. खातिया असे तलावात बुडून मृत्यू झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

रावणवाडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खातिया येथील शेतकरी महेंद्र कवरे हे शनिवारी दुपारी गावापासून काही अंतरावर असलेल्या माता मंदिर तलाव येथे बैलांना धुण्यासाठी घेऊन गेले होते. बैलांना धुतल्यानंतर त्यांना बैलबंडीला जुंपून बाहेर काढत असताना बैलबंडीचा तोल गेल्याने महेश कवरे हे बैलबंडीसह तलावात बुडाले. ज्या भागातून महेश कवरे यांनी बैलबंडी पलटविण्याचा प्रयत्न केला त्याच भागात खोल खड्डा असल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. परिणामी महेश कवरे यांचा व त्यांच्या एका बैलाचा तलावात बुडून मृत्यू झाला. ही घटना परिसरातील नागरिकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी घटनेची माहिती रावणवाडी पोलिसांनी दिली. माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शवविच्छेदनासाठी पाठविला. महेश कवरे यांच्या पश्चात वडील, पत्नी व तीन मुली आहे. त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले आहे.

## लग्नाच्या मिरवणुकीत दुचाकीची धडक, वृद्ध महिलेचा मृत्यू

आमगाव तालुक्यातील दहेगाव गावात लग्नाच्या मिरवणुकीवर अनियंत्रित दुचाकीने धडक दिल्याने एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला तर दुसरी गंभीर जखमी झाली. पोलिसांनी १४ फेब्रुवारी रोजी रात्री आरोपी दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत महिलेचे नाव कोकिलाबाई धनलाल भुजाडे (६४) असे आहे. ती गोंदिया तहसीलमधील फुलचूर येथील रहिवासी आहे. जखमी महिलेचे नाव नव्या उदापुरे आहे. ती मध्य प्रदेशातील लिंगा येथील रहिवासी आहे. या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, १४ फेब्रुवारी रोजी आमगाव पोलिस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या दहेगाव गावात एक लग्न समारंभ आयोजित करण्यात आला होता. रात्री ८:३० च्या सुमारास, लग्नाची मिरवणूक गावातून जात होती. मिरवणुकीत सहभागी असलेल्या कोकिलाबाई भुजाडे आणि नव्या उदापुरे रस्त्याच्या कडेला चालत होत्या. तेव्हा नोंदणी क्रमांक असलेली एक दुचाकी चालक आरोपी बळीराम ब्राह्मणकर, जो गोंदिया तहसीलमधील आवारोटोला येथील रहिवासी आहे, त्याने एमएच ३५/एक्स. २५०७ क्रमांकाच्या वाहनाने बेपर्वाईने आणि वेगाने कोकिलाबाई आणि नव्याला धडक दिली. या घटनेत कोकिलाबाईचा मृत्यू झाला, तर नव्या गंभीर जखमी झाली. आमगाव पोलिसांनी दुचाकी चालक विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### विहिरीत पडून प्रौढाचा मृत्यू

गोंदिया तालुक्यातील सालईटोला येथे विहिरीत बुडून परदेश सुरजलाल धुर्वे (५८) रा. सालईटोला, ता. जि. गोंदिया याचा मृत्यू झाला. ही घटना १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास सुमारे ९ वाजता उघडकीस आली. या प्रकरणी दवनीवाडा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

१३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी परदेश धुर्वे हे निलागोंदी येथील आठवडी बाजारातून घरी परतले होते. त्यानंतर गावात फेरफटका मारण्यासाठी बाहेर गेले; मात्र रात्री उशिरापर्यंत ते घरी परतले नाहीत. १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास त्यांची पत्नी लताबाई धुर्वे या घरासमोरील विहिरीवर पाणी आणण्यासाठी गेल्या असता बादलीसोबत पतीची चप्पलवर आली. यानंतर आरडाओरड केल्याने ग्रामस्थ जमा झाले. त्यापैकी एका व्यक्तीने विहिरीत उतरून पाहणी केली असता पाण्यावर मृतदेह तरंगताना दिसून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून पुढील तपासणीसाठी केटीएस रुग्णालय, गोंदिया येथे पाठविला. प्राथमिक तपासात विहिरीतील पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दवनीवाडा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपास पोलिस निरीक्षक वैशाली ढाले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### झाडाची फांदी डोक्यावर पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

सालेकसा तालुक्यातील गांधीटोला शेतशिवारात झाड तोडताना डोक्यावर फांदी पडल्याने ४२ वर्षीय व्यक्तीचा उपचारादरम्यान १४ फेब्रुवारी रोजी दुपारी १:४५ वाजताच्या दरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी सालेकसा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. भुवन सावतराम कोरे (४२) रा. गांधीटोला, ता. सालेकसा, जि. गोंदिया असे मृतकाचे नाव आहे. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १२ वाजताच्या सुमारास ते शेतात झाड कापत असताना अचानक झाडाची मोठी फांदी त्यांच्या डोक्यावर पडली. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव सुरू झाला. त्यांना तातडीने उपचारासाठी गोंदिया येथील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. सालेकसा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# एपस्टिन फाईल्समुळे भाजपाला दंगली घडवायच्या आहेत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

मालेगाव महापालिकेच्या उपमहापौरांनी आपल्या दालनात टिपू सुलतान यांचा फोटो लावण्यानं मोठा वाद निर्माण झाला आहे. या वादावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दोघांमध्ये वादाची ठिणगी उडाली आहे. दोघे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत फडणवीस यांनी सपकाळ यांना सडेतोड उत्तर दिल्यावर आज सपकाळ यांनी भाजप च्या अनेक नेत्यांची नावे एपस्टिन फाईल्समध्ये आल्यामुळे ते घाबरले आहेत. यामुळे लोकांना मूळ विषयावरून भरकटवण्यासाठी आणि राज्यात दंगली घडवण्यासाठी ते अशा प्रकारचे आरोप करत सुटल्याची टीका सपकाळ यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहेत, आन, बान, शान आहेत, त्यांचा पराक्रम अद्वितीय आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या प्रेरणेतून संविधानाची निर्मिती झाली आहे. भाजपकडून आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज शिकण्याची गरज नाही. एपस्टिन फाईल्समध्ये भाजपाच्या नेत्यांची नावे आली आहेत, अमेरिकेबरोबरचा व्यापार कराराचा मुद्दा आहे आणि राज्यातही ज्वलंत मुद्दे आहेत, या मुळ मुद्यांना बगल देण्यासाठी भाजपाकडून माझ्या वक्तव्याची मोडतोड करून ध चा मा करून राज्यात दंगली घडवायच्या आहेत, याचा प्रत्यय आज पुण्यात आला, असा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपावर केला आहे.



हर्षवर्धन सपकाळांचा मुख्यमंत्र्यांवर पलटवार

सपकाळ यांनी पुढे सांगितले की, मला माफी मागायला लावण्याची भाषा माफीवीरांचा पक्ष करत आहे. परंतु टिपू सुलतानच्या मुद्द्यावर बोलताना भाजपा व देवेंद्र फडणवीस हे विसरत आहेत की, नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत भाजपाच्या बॅनर्स व पोस्टर्सवर टिपू सुलतानचे फोटो होते. भाजपाने राज्यात अमरावती चंद्रपूरसह २१ ठिकाणी धर्मांध एमआयएमशी युती केली आहे, हे भाजपाला चालते, मग आताच काय झालं.

भाजपा काँग्रेस कार्यालयावर मोर्चा आणणार आणि १७ तारखेला माझे पुतळे जाळणार आहे, अशी माहिती मिळत आहे. मग सावरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याला कातलीय योग असे म्हटले आहे. सावरकरांनी महाराजांबद्दल जे विकृत लिखाण केले आहे तसेच भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल जी वक्तव्ये केली, त्याबद्दल भाजपा सावरकर आणि कोश्यारी यांचे पुतळे जाळणार का? असा माझा प्रश्न आहे असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# हर हर महादेवच्या जयघोषात नंदनवन परिसर दुमदुमूला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :



नंदनवन परिसरातील ५१ फूट उंच भगवान शंकरराच्या भव्य मूर्तीसमोर महाशिवरात्री निमित्त भाविकांची मोठी गर्दी उसळली. पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. हर हर महादेवच्या जयघोषात परिसर दुमदुमून गेला होता. महाशिवरात्री निमित्ताने मंदिर परिसरात विशेष पूजन, अभिषेक व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. आकर्षक फुलांची सजावट आणि रोषणाईमुळे परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले होते. महिला, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन घेतले.

स्थानिक मंडळांच्या वतीने महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. भाविकांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची व वैद्यकीय मदतीची व्यवस्था करण्यात आली होती. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष बंदोबस्त ठेवला होता. ५१ फूट उंच भगवान शंकराची भव्य मूर्ती नंदनवन परिसराचे प्रमुख आकर्षण मानली जाते. शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी येथे भाविकांची मोठी गर्दी होत असते. यंदाही भक्तिमय वातावरणात कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# टिप्परच्या धडकेत तरुण ठार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

बजरंगबलीचे भक्त असलेल्या मित्रांनी सकाळी दर्शनासाठी बाबुळखेडा हनुमान मंदिरात दर्शनाचा बेत केला. त्यातल्या दोघांना काही काम अपूर्ण राहिल्याचे आठवल्याने हे मित्र पुन्हा नागपूरच्या दिशेने निघाले. मात्र पिटेसूर परिसरात दबा धरून बसलेल्या काळाने चुकीच्या दिशेने भरधाव वेगात येणाऱ्या टिप्परच्या रुपात झडप टाकत धडक दिली. यात अपघातग्रस्त कार स्वराज फार्म हाऊसच्या सुरक्षा भिंतीवर आदळली. त्यामुळे गंभीर दुखापतग्रस्त आर्यन गुरुदेव डाफ (२२, रा. महाजन कॉम्प्लेक्स, झिंगाबाई टाकळी) याचा मृत्यू ओढवला.

ही घटना गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. व्हॅलेंटाईन डे आणि शनिवार असल्याने सहा मित्रांनी बाबुळखेडा येथील हनुमान मंदिरात दर्शनाचे नियोजन केले होते. अमन पारधी (२२) यांच्या कारने हे सहा जण बजरंगबलीच्या दर्शनासाठी निघाले. वाटेत अभिजित खडके आणि अभिषेक दुरई यांनी परतण्याची सूचना केल्याने कारचालक अमनने गाडी वळवली.

त्याच वेळी स्वराज फार्म हाऊसकडून चुकीच्या दिशेने येणाऱ्या टिप्परने कारला समोरून जोरदार धडक दिली. अपघाताची तीव्रता इतकी होती की कार दोनदा फिरून



भिंतीवर जाऊन आपटली. धडक दिल्यानंतर टिप्पर चालक वाहन सोडून फरार झाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमींना खासगी रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी आर्यन डाफ याला मृत घोषित केले.

अमन पारधी, अभिजित खडके (रा. गोधनी रोड, मानकापूर), गौरव कांबळे (२०), रोहन तांडेकर (२०) आणि अभिषेक दुरई (२१) हे पाच जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच गिट्टीखदान पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. फरार टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे.

चुकीच्या दिशेने वाहनचालना आणि वेगमर्यादेचे उल्लंघन यामुळे पुन्हा एकदा निष्पाप जीव गमावल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मुख्य सूत्रधार डॉक्टर नीतेश बाजपेयीचा आत्महत्येचा प्रयत्न



## बाळ विक्री प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी,
भंडारा/गोंदिया, दि. १५ :

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या १० दिवसांच्या बालिकेच्या विक्री प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी डॉक्टर नीतेश बाजपेयी याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांचा ससेमिरा आणि अटकेची भीती यामुळे त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉक्टर नीतेश बाजपेयी १४ फेब्रुवारी रोजी कटंगी येथून स्वतःच्या वाहनाने भंडाऱ्याच्या दिशेने येत होता. प्रवासादरम्यान त्याने स्वतःजवळ असलेल्या ब्लेडने शरीरावर आणि पोटावर गंभीर वार करून घेतले. रक्ताच्या थारोळ्यात असलेल्या डॉक्टराला तातडीने तुमसर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारासाठी भंडाऱ्यातील एका खासगी रुग्णालयात हलवण्यात आले असून, सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

एका गरीब दाम्पत्याच्या १० दिवसांच्या मुलीला 'नागपूरला मोफत उपचार करून देतो' असे खोटे आमिष दाखवून, ३ फेब्रुवारी रोजी तिचा अडीच ते तीन लाख रुपयांत सौदा करण्याचा प्रयत्न उघडकीस आला होता. डॉक्टर बाजपेयी हा गोंदियातील 'न्यू बालाजी हॉस्पिटल'चा संचालक आहे. या संपूर्ण रॅकेटचा तो मुख्य सूत्रधार मानला जातो. या प्रकरणात आतापर्यंत ६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी दोघांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. डॉक्टर बाजपेयी याच्या अटकपूर्व जामिनावर १७ फेब्रुवारी रोजी न्यायालयात सुनावणी होणार होती. मात्र, अटकेच्या धास्तीने त्याने सुनावणीच्या ३ दिवस आधीच स्वतःला संपवण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे पोलिस प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.




नागपूर : महाशिवरात्रीनिमित्त घाट रोड नागपूर येथे भाविकांची गर्दी. अनेक ठिकाणी भाविकांनी दर्शन घेऊ महाप्रसादाचा लाभ घेतला

# २ कोटी रुपयांचा गंडा घालणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

केंद्रीय मंत्रालयात नोकरी आणि गॅस एजन्सी मिळवून देण्याचे आमिष दाखवत मध्य प्रदेश व उत्तर प्रदेशातील ठगबाजांच्या टोळीने नागपुरातील नागरिकांना तब्बल दोन कोटी रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बनावट नियुक्तीपत्रे आणि एजन्सीची कागदपत्रे देत विश्वास संपादन करणाऱ्या या टोळीविरोधात बेलतरोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामचंद्र मेहपत पाटील (रा. मुलताई, मध्य प्रदेश), देवेंद्र भार्गव (रा. ग्वाल्हेर, मध्य प्रदेश), शिवम संतोषकुमार सेन (रा. सागर, मध्य प्रदेश) आणि योगेश मिश्रा (रा. लखनऊ, उत्तर प्रदेश) अशी आरोपींची नावे आहेत. यापैकी भार्गव हा स्वतःला केंद्रीय मंत्रालयातील अधिकाऱ्याच्या खासगी स्वीय सहाय्यकाचा सहकारी असल्याचे भासवत होता.

# जळगावमध्ये तणाव! कडकडीत बंद,

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १५ :

जिल्ह्यातील जळगाव जामोद शहरात शनिवारी,रात्री उशिरा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील स्मारकासमोर एका माथेफिरु युवकाने विटंबना केल्याच्या प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे शहरात मोठा जमाव रस्त्यावर उतरला असून अजूनही तणाव कायम आहे. रविवारी दुपारपर्यंत कडकडीत बंद पाळण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकारी गावात दाखल झाले असून पोलिसांच्या कडक बंदोबस्त मुळे जळगाव ला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

हा सगळा संताप जनक प्रकार सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाल्याने, आरोपी निष्पन्न झाला. राहुल विश्राम लांडे असे आरोपीचे नाव आहे. त्याने, स्मारकासमोर अंडे फेकून विटंबना केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. घटनेची माहिती मिळताच जळगाव जामोद पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेऊन त्यास चार तासात अटक केली आहे. आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या शहरात तणाव पूर्ण शांतता असून आज फेब्रुवारी रोजी दुपारपर्यंत शहर बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला प्रतिसाद देत कडकडीत बंद पाळण्यात आला. पोलीस उपविभागीय अधिकारी आनंद महाजन यांनी सर्व नागरिकांना शांतते सोबतच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# कोराडी येथील महालक्ष्मी जगदंबा संस्थानचा विकास

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा मंदिर परिसर आता भक्ती व आध्यात्मिक केंद्रासह कौशल्य वैकास आणि गौरवशाली भारताच्या ऐतिहासिक पाऊलखुणांना अधोरेखित करणाऱ्या भारत मंडपमसह कौशल्य विकास व महिला सक्षमीकरणाचे एक परिपूर्ण व्यापक संकुल म्हणून नावारूपास येत आहे. मागील काही वर्षांपासून संस्थान परिसरात लहान उपक्रमातून सुरु झालेली सुरुवात आता सुमारे ५०० मुलामुलींच्या निवासव्यवस्थेसह कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून पुढे येईल. गत काही महिन्यांपासून माविम मार्फत संस्थानने सुरु केलेल्या रेडिमेड गारमेंट क्लस्टरने अनेक महिलांचा आत्मविश्वास वाढविला आहे. येथील अगरबत्ती व इतर व्यवसाय व कौशल्य प्रशिक्षणानंतर अनेक महिलांना रोजगार



उपलब्ध झाला असल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान परिसरात नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) आणि नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्या माध्यमातून सुरु असलेल्या विविध विकास कामांची माहिती माध्यमांना व्हावी या उद्देशाने त्यांनी क्षेत्रभेट व प्रतिनिधींशी संवाद साधला.

मंदिर परिसरातील तलाव क्रमांक-३ मध्ये भारतातील भव्य व उंच म्हणून गणल्या जाणाऱ्या १५८ फूट उंचीच्या आरसीसी हनुमान मूर्ती स्थळाच्या कामाची पाहणी करून याबाबत त्यांनी माहिती दिली. या संपूर्ण तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी शासनाने २१४ कोटी ९४ लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. येथे उभारण्यात येत असलेल्या वीर हनुमानाच्या भव्य मूर्तीचा पाया महानिर्मितीद्वारे तयार करण्यात आला आहे. मूर्ती पूर्ण झाल्यावर त्यावर आकर्षक 'लेझर प्रोजेक्शन मॅपिंग' आणि तलावामध्ये 'अंडर वॉटर लायटिंग' करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी २२ कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

# कर्मचाऱ्यांनी चक्क केबलच कापले ५४ टॉवरवरील नेटवर्क सेवा खंडित

■ महासागर प्रतिनिधी,
भंडारा, दि. १५ :



रिलायन्स जिओ कंपनीकडे पगारवाढीची मागणी केली. संपही केला. परंतु, कंपनीने मागणीकडे दुर्लक्ष केल्याने संतापलेल्या दोन कर्मचाऱ्यांनी जियो कंपनीच्या मोबाइल टॉवरवरील केबलच कापली. त्यामुळे तब्बल २५८ तास नेटवर्क खंडीत राहिले. याचा फटका जिल्ह्यातील लाखो ग्राहकांना बसला त्यातून कंपनीचे तीन लाख रुपयांचे नुकसान ही झाले आहे. या प्रकरणी दोन्ही कर्मचाऱ्यांविरुद्ध भंडारा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मनोज राजेंद्र पाटील आणि राकेश धांडे अशी या दोन कर्मचाऱ्यांची नावे आहेत. राजेंद्र आणि राकेश हे दोघे जिओ कंपनीत तंत्रज्ञ म्हणून कामाला आहेत. काही दिवसांपासून त्यांनी कंपनीकडे पगारवाढीची मागणी केली. मागणी पूर्ण न झाल्याने दोन्ही कर्मचारी संपावर गेले होते. तरीही कंपनीकडून कोणतीही हालचाल होत नसल्याने त्यांनी कंपनीच्या नेटवर्कच्या कामात हस्तक्षेप निर्माण केला. ९ फेब्रुवारी रोजी दोन्ही कर्मचाऱ्यांनी रिलायंस जिओ कंपनी मोबाइल टॉवरवरील फायबर केबल कापली. त्यामुळे ५४ टॉवरवरील नेटवर्क सेवा २५८ तासांसाठी खंडीत झाली. शिवाय त्यात कंपनीचे तीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे.

सोबतच जिओ कंपनीच्या मोबाइलधारकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. याप्रकरणी दोन्ही कर्मचाऱ्यांविरुद्ध भंडारा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अचानक मोबाईलचे नेटवर्क गेल्याने जिल्ह्यात अनेक ठिकाणी खळबळ उडाली. नेटवर्क जाण्याचे नक्की कारण ही कोणाला समजत नव्हते. त्यामुळे मोबाईलधारकांमध्ये संभ्रमाचं वातावरण होतं. मात्र ही बाब लवकरच त्यांच्या ही लक्षात आली. या प्रकरणी दोन्ही कर्मचाऱ्यांविरुद्ध भंडारा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# संविधान बदलण्याचा प्रयत्न केल्यास देशात तिसरे महायुद्ध होईल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :

देशातील सर्व जातीधर्मांच्या स्त्रिया आणि बहुजन समाजावर धार्मिक गुलामगिरी लादलेली होती. ही ५ हजार वर्षांची धार्मिक गुलामगिरी संविधानाने संपवली. त्यामुळे हे संविधान आम्हाला प्राणाहून प्रिय आहे. जो संविधानविरोधी आहे, तो मानवतेचा शत्रू आहे, तो आमचा शत्रू आहे. संविधानावर आघात करण्याचा, ते बदलण्याचा प्रयत्न केला गेला तर या देशातच तिसरे महायुद्ध होईल, असा इशारा विचारवंत ॲड. सचिन मेकाले यांनी दिला.

पुरोगामी प्रबोधन चळवळीच्यावतीने शनिवारी उरुवेला कॉलनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृहात राज्यस्तरीय महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ लेखिका अरुणा सबाने, महात्मा फुले यांच्या पणतू सून नीता होले, प्रमोदिनी रामटेके, संध्या राजूरकर, सारिका मोकदम, माधुरी झाडे, शुभांगी मालखेडे प्रामुख्याने उपस्थित होते.

संविधानाने महिलांना काय दिले? या विषयावर




## नागपुरात महिला परिषदेत रोखठोक इशारा

बोलताना ॲड. मेकाले म्हणाले, या देशात हजारो वर्ष स्त्रियांना उपभोगाची वस्तू म्हणून समजल्या जात होती. त्यांना शिक्षणाचा, बोलण्याचाही अधिकार नव्हता. संविधानाने या देशातील महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व काही दिले, ज्याचा लाभ प्रत्येक धमार्तील स्त्रिया घेत आहे. त्यामुळे पृथ्वीच्या अस्तापर्यंत भारतीय संविधान स्त्रियांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहणार आहे. संविधान आहे तोवर या देशातील सर्व धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने आहेत. हा विचार, हा वारसा पुढच्या पिढीला देणे, हेच आपले कर्तव्य आहे, असेही ते म्हणाले.

अरुणा सबाने म्हणाल्या, हृदयात संविधान होते म्हणून या पुरोगामी चळवळीत आले आणि खडतर आयुष्यातही तग धरू शकले. सावित्रीबाई ते ताराबाईपर्यंतचा वारसा हा हजारो वर्षांच्या विषमतावादी अंधारातून समतावादी प्रकाशात नेणारा आहे. आधीच्या पिढीने फार कष्टाने आपल्याला मुक्तपणे जगण्याचे बळ दिले आहे. त्यामुळे तो आपल्याला सांभाळायचा आहे. लेखकांनी अधिकाधिक पुरोगामी साहित्य निर्माण करण्याची गरज आहे. कारण लेखनामध्ये खडक फोडण्याची ताकद आहे. ज्योत्स्ना बनसोड यांनी प्रास्ताविक केले. संचालन प्रा. शेषराव नेवारे व प्रतिभा खोब्रागडे यांनी केले.

महात्मा फुले यांच्या वंशज नीता होले यांनी देशात धर्मवादाचे जाळे पसरविले जात असल्याची भीती व्यक्त केली. त्या म्हणाल्या, संविधानाला बगल देत देशात धार्मिक एजेंडा राबविला जात आहे. टीव्हीवरील मालिका, चित्रपट व जागोजागी होणाऱ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून पुन्हा धार्मिक एजेंडा राबविला जात आहे. त्यातून स्त्रियांना पुन्हा मानसिक गुलाम करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचे त्या म्हणाल्या.